POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-३२० ● मुंबई, सोमवार, २२ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

महाराष्ट्रासह चार राज्यांत बनावट औषधांचे रॅकेट उघड... एफडीएची कारवाई

अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि पंजाबमध्ये पसरलेले बनावट औषधांचे एक मोठे रॅकेट उघडकीला आणले आहे. यामध्ये बनावट ॲलोपॅथिक औषधे आणि भेसळयुक्त आयुर्वेदिक उत्पादनांचा समावेश आहे.



''बनावट, भेसळयुक्त आणि निकृष्ट दर्जाच्या औषधांची विक्री थेट सार्वजनिक आरोग्यासाठी धोकादायक आहे. एफडीए बनावट औषधांच्या विरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरण राबवत असून, सार्वजनिक आरोग्याशी खेळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल.''

-तुकाराम मुंढे, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,

अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि पंजाबमध्ये पसरलेले बनावट औषधांचे एक मोठे रॅकेट उघडकीला आणले आहे. यामध्ये बनावट ॲलोपॅथिक औषधे आणि भेसळयुक्त आयुर्वेदिक उत्पादनांचा समावेश आहे.

नागपुरात एका प्रकरणात 'कायमोरल फोर्ट' या लोकप्रिय दाहशामक औषधाच्या बनावट आवृत्त्यांची विक्री होत असल्याचे समोर आले. औषध दुकाने आणि घाऊक विक्रेत्यांकडून नमुने गोळा करून ते मुंबईतील राज्य प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले. या तपासणीत औषधांमधील एन्झाईमची पातळी निर्धारित मानकांपेक्षा खूपच कमी असल्याचे आढळले. मूळ उत्पादक कंपनीनेही हे जप्त केलेले आपल्या कंपनीने बनवलेले नाही, असे स्पष्ट केल्यानंतर ते बनावट असल्याचे सिद्ध झाले. या प्रकरणी १२ व्यक्ती उत्पादन व संस्थांविरुद्ध गुन्हे दाखल केले.

आयुर्वेदिक कॅप्सूलमध्ये 'टाडालाफिल'चे मिश्रण


दुसऱ्या प्रकरणात कामराज कॅप्सूल या आयुर्वेदिक उत्पादनाची एफडीएने तपासणी केली. यात कॅप्सूलमध्ये पुरुषांमधील इरेक्टाइल डिसफंक्शनसाठी वापरले जाणारे प्रिस्क्रिप्शन औषध टाडालाफिल आणि पॅरासिटामोलचे घटक असल्याचे आढळले. एफडीए अधिकाऱ्यांनी सांगितले की, 'औषध आणि सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४०' आणि 'भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३' अंतर्गत या प्रकरणांमध्ये पुढील कडक कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

हृदयविकार, उच्च रक्तदाबाच्या रुग्णांसाठी धोकादायक

आरोग्य तज्ज्ञांनी चेतावणी दिली आहे की, 'टाडालाफिल'चे अनपेक्षित सेवन हृदयविकार, उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांसाठी अत्यंत धोकादायक ठरू शकते. या कॅप्सूलच्या निर्मिती आणि पुरवठ्याचे जाळे नागपूर, पंजाब आणि उत्तर प्रदेशपर्यंत पसरलेले होते. या प्रकरणीही संबंधित कंपन्या आणि व्यक्तींविरुद्ध गुन्हे दाखल केले.

परभणीत भीषण दुर्घटना

मंदिरातील बांधकामाचा भाग कोसळून 7 भाविकांचा मृत्यू



■परभणी। प्रतिनिधी,

महाराष्ट्रातील परभणी जिल्ह्यातील यशवाडी देवस्थान हनुमान मंदिरात शनिवारी मोठी दुर्घटना घडली. मंदिर परिसरात बांधकाम सुरू असलेल्या सभागृहाचा काही भाग अचानक कोसळल्याने 7 भाविकांचा मृत्यू झाला असून किमान 32 जण जखमी झाले आहेत. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंदिरात धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोठ्या संख्येने भाविक मंदिर परिसरात उपस्थित होते. कार्यक्रम सुरू असतानाच बांधकामाधीन सभागृहाच्या छताचा आणि बांबूच्या आधारावरील संरचनेचा काही भाग अचानक कोसळला. त्यामुळे अनेक भाविक ढिगाऱ्याखाली अडकले.

घटनेचा सीसीटीव्हीत कैद

घटनेनंतर परिसरात एकच गोंधळ उडाला. मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये ही संपूर्ण घटना कैद झाली असून त्यामध्ये रचना कोसळल्यानंतर भाविकांमध्ये झालेली धावपळ आणि घबराट स्पष्ट दिसत आहे. दुर्घटनेची माहिती मिळताच पोलीस, आपत्कालीन पथके आणि जिल्हा प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने बचावकार्य सुरू करण्यात आले. ढिगारा हटवून अडकलेल्या भाविकांना बाहेर काढण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर करण्यात आले.

जखमींवर उपचार सुरु

जखमींना तातडीने रुग्णवाहिकांद्वारे परभणी जिल्हा शासकीय रुग्णालयासह जवळच्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे. काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.दरम्यान, ही दुर्घटना नेमकी कशामुळे घडली याचा तपास प्रशासनाकडून सुरू करण्यात आला आहे. बांधकामाच्या सुरक्षिततेबाबतही चौकशी केली जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मंचुरियनमध्ये आढळली पाल

उल्हासनगरात एक भयंकर घटना घडली आहे. एका चायनीज दुकानातून आणलेले चायनीज मंच्युरियन खात असताना एका तरुणीला त्यात चक्क पालीचे मेलेले पिल्लु आढळल्याची विचित्र प्रकार घडला आहे. यामुळे या तरुणीला उलट्या आणि मळमळ झाल्याची तिची तब्येत बिघडल्याने तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या दुकानादारावर कारवाई करण्याची मागणी होत आहे. उल्हासनगरच्या सुभाष टेकडी परिसरात मोना पठारे ही तरुणी तिच्या कुटुंबासह रहाते. सायंकाळच्या सुमारास तिने सुभाष टेकडी मच्छी मार्केट परिसरातील मोरे चायनीज भेळ वाल्याकडून मंच्युरियन घरी आणले होते. हे मंचुरियन खात असतानाच तिने चटणी घेतली तर त्यात पालीचं मेलेलं पिल्लू असल्याचं तिला आढळले. त्यामुळे तिने मंच्युरियन वाल्याला जाऊन सांगितले. त्यावेळी या मंच्युरियन वाल्याने ही चटणी टेस्टिंगसाठी पाठवतो, पण तू ही गोष्ट कोणाला सांगू नको असे तिला समजावले. यानंतर रात्री या तरुणीची तब्येत बिघडल्याने तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या या तरुणीवर रुग्णालयात उपचार सुरू असून अशाप्रकारे निष्काळजीपणा करून ग्राहकांच्या जीवाशी खेळणाऱ्या चायनीज भेळ आणि मंचुरियन विक्रेत्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

उद्घाटन केलेल्या मॉलवर ४८ तासांतच एफडीएची धाड!

मॉलमध्ये असं नेमकं काय सापडलं?





सिंधुदुर्ग : अवघ्या दोन दिवसांपूर्वी अभिनेत्री प्राजक्ता माळीच्या हस्ते दिमाखात उद्घाटन झालेल्या कुडाळ येथील 'आपला बाजार' मॉलवर शुक्रवारी अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने अचानक धाड टाकल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. उद्घाटनाची चर्चा सुरू असतानाच सरकारी यंत्रणेच्या या कारवाईमुळे मॉल आणि प्रशासनाच्या हालचालींबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

राज्यात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईचा धडाका लावला आहे. त्याच पार्श्वभूमीवर कोकणातील विविध ठिकाणी तपासण्या सुरू असून कुडाळमधील ही कारवाई विशेष चर्चेचा विषय ठरली आहे.

ग्राहकांना बाहेर काढून चौकशीला सुरुवात : मिळालेल्या माहितीनुसार, एफडीएचे पथक शुक्रवारी अचानक 'आपला बाजार' मॉलमध्ये दाखल झाले. अधिकाऱ्यांनी सर्वप्रथम खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांना बाहेर जाण्यास सांगितले आणि त्यानंतर मॉलचे मुख्य प्रवेशद्वार बंद करून तपासणी मोहीम सुरू केली. पथकाकडून अन्नपदार्थांचे परवाने, साठा, उत्पादनांची गुणवत्ता, लेबलिंग तसेच इतर कायदेशीर कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. मॉलमधील व्यवस्थापन आणि कर्मचाऱ्यांचीही चौकशी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

उद्घाटनानंतर लगेच कारवाई; चर्चांना उधाण : बुधवार १७ जून रोजी प्रसिद्ध अभिनेत्री प्राजक्ता माळीच्या उपस्थितीत या मॉलचे मोठ्या उत्साहात उद्घाटन झाले होते. मात्र अवघ्या ४८ तासांतच ऋऊअच्या पथकाने धाड टाकल्याने स्थानिकांमध्ये चर्चांना उधाण आले आहे. मॉलवर नेमकी कोणत्या कारणामुळे तपासणी करण्यात आली, याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नसली तरी या घटनेची बातमी शहरात वाऱ्यासारखी पसरली आणि मॉलबाहेर नागरिकांची गर्दी झाली.

नागरिकांची तपासणीची मागणी : रत्नागिरी आणि सिंधुदुर्गसह कोकणातील अनेक भागांत उघड्यावर चालणाऱ्या खाद्यपदार्थ विक्री केंद्रांवरही ऋऊने लक्ष केंद्रित करावे, अशी मागणी आता जोर धरत आहे. अन्नसुरक्षा नियमांचे पालन होत आहे का, याची सर्वसमावेशक तपासणी व्हावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. दरम्यान, 'आपला बाजार' मॉलवरील तपासणीचा अंतिम अहवाल आणि प्रशासनाची अधिकृत भूमिका समोर आल्यानंतरच या कारवाईमागील नेमके कारण स्पष्ट होणार आहे. सध्या मात्र या धाडीची चर्चा संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्यात रंगली आहे.

ज्यूसमध्ये गुंगीचे औषध देऊन बलात्कार

ब्लॅकमेलिंग अन् जबरदस्तीने धर्मांतर

नागपूरमध्ये भारतीय वायुसेना जवानाच्या पत्नीचे धर्मांतरण आणि अत्याचार करणाऱ्या प्रकरणातील तिसरा मुख्य आरोपी मौलाना मजरत मेहमूद मकसूद याने अखेर पोलिसांसमोर शरणागती पत्करली आहे.



■नागपूर। प्रतिनिधी,

नागपूरमध्ये भारतीय वायुसेनेतील जवानाच्या पत्नीचे धर्मांतरण आणि तिच्यावर झालेल्या अत्याचाराच्या प्रकरणाने संपूर्ण राज्यात खळबळ उडवून दिली आहे. या गंभीर प्रकरणातील तिसरा मुख्य आरोपी मौलाना मजरत मेहमूद मकसूद हा गेल्या काही दिवसांपासून फरार होता, मात्र अखेर त्याने बुधवारी रात्री उशिरा सोनेगाव पोलीस ठाण्यात हजर होऊन शरणागती पत्करली आहे. 38 वर्षीय मौलाना मजरत हा मध्य प्रदेशातील छिंदवाडा येथील रहिवासी असून, त्याला अटक करण्यात आली आहे. गुरुवारी त्याला न्यायालयात हजर केले जाणार असून, त्याच्या अटकेमुळे या कथित धर्मांतरण प्रकरणाचे आणि अत्याचाराचे सत्य लवकरच समोर येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

ज्यूसमध्ये गुंगीचे औषध देऊन बलात्कार

या प्रकरणाची सुरुवात फेब्रुवारी 2025 मध्ये झाली, जेव्हा पीडित महिलेच्या ओळखीच्या ताज मदर या जुन्या सहकाऱ्याने प्लॉट खरेदीच्या बहाण्याने तिला भेटण्यासाठी बोलावले. महिलेच्या तक्रारीनुसार, वर्धा रोडवरील एका हॉटेलमध्ये तिला ज्यूसमध्ये गुंगीचे औषध देऊन बेशुद्ध करण्यात आले. यानंतर आरोपीने तिच्यावर अत्याचार करून त्याचे व्हिडिओ आणि फोटो काढले. या आक्षेपार्ह फोटोंचा आणि व्हिडिओंचा वापर करून आरोपीने तिची ब्लॅकमेलिंग सुरू केली. पीडितेकडून सुमारे 3 लाख 9 हजार रुपये उकळण्यात आले आणि तिच्यावर इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी सतत दबाव टाकला गेला, असेही फियार्दीत नमूद करण्यात आले आहे.

महिलेचा कलमा वाचतानाचा व्हिडीओ व्हायरल

या प्रकरणी सोनेगाव पोलिसांनी यापूर्वीच 26 वर्षीय अय्याज ताज मदर आणि 30 वर्षीय अमीन शेख या दोन आरोपींना अटक केली आहे. सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल झाला होता, ज्यामध्ये पीडित महिला कलमा वाचताना आणि आरोपी तिच्यावर फुंक मारताना दिसत आहेत. या व्हिडिओच्या आधारे पोलिसांनी तपास सुरू केला होता. या व्हिडिओचे चित्रीकरण करणाऱ्या महिलेलाही चौकशीसाठी बोलावण्यात आले होते, मात्र ती उपस्थित न राहिल्याने पोलीस आता तिच्या घरी जाऊन जबाब नोंदवण्याची तयारी करत आहेत. या धर्मांतरण प्रकरणातील धार्मिक रितीरिवाज आणि प्रक्रिया कशा प्रकारे राबवल्या गेल्या, याचा उलगडा आता मौलानाची चौकशी केल्यानंतर होणार आहे.

पीडित महिला स्वतः एक प्रॉपर्टी डीलर असून तिचे पती भारतीय वायुसेनेत कार्यरत आहेत. आपल्या पतीच्या अनुपस्थितीत तिला या संकटाचा सामना करावा लागला, हे अत्यंत दुदैर्वी आहे. या प्रकरणातील आरोपींची साखळी मोठी असून पोलीस आता सर्व बाजूंनी तपास करत आहेत. मौलानाची अटक हे या प्रकरणातील एक मोठे यश मानले जात आहे. अशा प्रकारच्या कृत्यामुळे समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आरोपींना कडक शिक्षा व्हावी अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. पोलीस पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून गुन्हेगारांना न्यायाच्या कचाट्यात खेचण्यासाठी सज्ज झाले आहेत.

बेकायदेशीरपणे गाईंची टेम्पोत कोंबून

तरुणाच्या सतर्कतेमुळे विरारमध्ये प्रकार उघड

विरार पूर्वेकडील शिरसाठ अंबाडी रस्त्यावरून एका टेम्पोमध्ये गाईंना अत्यंत क्रूरपणे कोंबून त्यांची बेकायदेशीर वाहतूक केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.



■वसई। प्रतिनिधी,

वसई विरार पूर्वेकडील शिरसाड अंबाडी रस्त्यावरून एका टेम्पोमध्ये गाईंना अत्यंत क्रूरपणे कोंबून, त्यांची बेकायदेशीर वाहतूक केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शुक्रवारी रात्री साडेअकराच्या सुमारास एका स्थानिक तरुणाला टेम्पोच्या संशयास्पद हालचाली दिसल्याने हा प्रकार उघडकीस आला पोलीस आणि स्थानिक नागरिकांच्या तत्परतेमुळे तीन गाईंची सुखरूप सुटका करण्यात आली आहे.

नेमकी घटना काय घडली ?

शुक्रवारी रात्री साडेअकराच्या सुमारास एक छोटा हत्ती टेम्पो (क्रमांक एमएच 48-उइ-3570) वज्रेश्वरीकडून शिरसाडच्या दिशेने जात होता. यावेळी पाठीमागून येणारे स्थानिक नागरिक पिंट्या यांना या टेम्पोबाबत संशय आला. त्यांनी तात्काळ टेम्पोचा पाठलाग सुरू केला. हा टेम्पो उसगाव येथील श्रमजीवी संघटनेच्या कार्यालयाजवळ आला असता पिंट्या यांनी टेम्पो चालकाला गाडी थांबवण्याचा इशारा केला गाडी थांबवताच संतापलेल्या टेम्पो चालकाने पिंट्या यांच्या कानशिलात लगावली आणि अंधाराचा फायदा घेत गाडीची चावी घेऊन जवळच असलेल्या जंगलात पळ काढला.

गोशाळेत गाईंना जीवदान

या घटनेची माहिती मिळताच भूमिपुत्र संघर्ष समिती चे कार्यकर्ते आणि मांडवी पोलीस ठाण्याचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले पोलिसांनी आणि कार्यकर्त्यांनी मिळून टेम्पोची पाहणी केली असता, त्यात अत्यंत निर्दयीपणे ३ गाईना कोंबून बांधल्याचे आढळून आले यानंतर कार्यकर्त्यांनी तात्काळ तिन्ही गाईंची टेम्पोमधून सुखरूप सुटका केली वैद्यकीय तपासणीनंतर या गाईना तुंगारेश्वर गोशाळेत सुरक्षितपणे पोहोचवण्यात आले आहे.

पोलीस कारवाई

याप्रकरणी मांडवी पोलिसांनी संबंधित टेम्पो जप्त केला असून, पळून गेलेल्या अज्ञात चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे पोलीस सध्या त्याचा कसून शोध घेत आहेत.

प्राणिप्रेमींकडून चिंता व्यक्त

विरार आणि परिसरामध्ये गेल्या काही दिवसांपासून गाईंची व अन्य जनावरांची अशा प्रकारे क्रूरपणे वाहतूक करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या वाढत्या प्रकारांमुळे स्थानिक प्राणिप्रेमींनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. यापूर्वीसुद्धा महामार्गालगतच्या गाव पाड्यांच्या भागातून जनावरे चोरून नेणारी टोळी सक्रिय झाली होती त्यामुळे अशा गुन्हेगारांवर पोलिसांनी कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

गोवंश जनावरांची बेकायदेशीर वाहतूक

शहर पोलिसांकडून तिघांवर हद्दपारीची कारवाई

■नाशिक। प्रतिनिधी,

गोवंश जातीच्या जनावरांची बेकायदेशीर वाहतूक, कत्तल आणि मांसविक्रीसारखे गंभीर गुन्हे करणाऱ्या तीन सराईत गुन्हेगारांवर नाशिक शहर पोलिसांनी हद्दपारीची कारवाई केली आहे. सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेला बाधा निर्माण करणाऱ्या गुन्हेगारांविरोधात कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याच्या पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली.

तिघांवर हद्दपारीची कारवाई

पोलीस उपायुक्त किशोर काळे यांनी रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा आढावा घेऊन संबंधित विभागीय सहाय्यक पोलीस आयुक्त व पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. गुन्हेगारांविरुद्ध दाखल गुन्हे, त्यांचे वास्तव्य, हालचाली व वर्तन यांची तपासणी करून प्रतिबंधात्मक कारवाईचे प्रस्ताव तयार करण्यात आले. यानुसार नवाज रशीद सय्यद उर्फ मुन्ना (वय ५२, रा. बागवानपुरा, नाशिक रोड), जमील रशीद कुरेशी (वय ४०, रा. नाईकवाडीपुरा, जुने नाशिक) आणि अंजुम बिस्मिल्ला कुरेशी (वय ५०, रा. मुंबई नाका, नाशिक) या तिघांवर कारवाई करण्यात आली.

या तिघांविरुद्ध गोवंश जनावरांची बेकायदेशीर वाहतूक, कत्तल आणि मांसविक्रीचे गंभीर गुन्हे दाखल असून त्यांनी प्राण्यांच्या जीवितास तसेच नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण केल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. याशिवाय विरोध करणाऱ्यांना मारहाण करणे, जीवे मारण्याच्या धमक्या देणे आणि परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण करणे असे प्रकारही त्यांनी केल्याचे आढळून आले.

या गुन्हेगारी कृत्यांमुळे शहरातील सार्वजनिक शांतता आणि सुव्यवस्थेला धोका निर्माण होत असल्याने पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त किशोर काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन बारी (अंबड विभाग) आणि सहाय्यक पोलीस आयुक्त संगीता निकम (नाशिक रोड विभाग) यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ५६(१)(अ) व (ब) अन्वये तिन्ही गुन्हेगारांना नाशिक जिल्ह्याबाहेर हद्दपार केले आहे.

गामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर तसेच सामाजिक स्वास्थ्य बिघडविणाऱ्या आणि जनजीवन विस्कळीत करणाऱ्या गुन्हेगारांविरोधात यापुढेही हद्दपारी व एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्धतेसारख्या कठोर प्रतिबंधात्मक कारवाया सुरू राहतील, असा इशारा पोलिसांनी दिला आहे. तसेच नागरिकांनी निर्भयपणे पुढे येऊन गुन्हेगारीविषयी माहिती द्यावी, माहिती देणाऱ्यांची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल, असे आवाहन पोलीस उपायुक्त किशोर काळे यांनी केले आहे.

बेकायदा भरतीसाठी उमेदवारांकडून 16.85 लाखांची वसुली... निवृत्त संचालकावर गुन्हा दाखल

■धुळे। प्रतिनिधी,

धुळे जिल्ह्यातून एक धकाकदायक प्रकार समोर आला आहे. धुळे जिल्ह्यातील कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) प्रकल्पातील भरती प्रक्रियेत मोठा भ्रष्टाचार उघडकीस आला असून, गट तंत्रज्ञान व्यवस्थापक (बीटीएम) आणि सहायक तंत्रज्ञान अधिकारी (एटीएम) पदांच्या नियुक्त्यांसाठी उमेदवारांकडून तब्बल 16 लाख 85 हजार रुपयांची वसुली करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

या प्रकरणी तत्कालीन प्रकल्प संचालक तथा सेवानिवृत्त अधिकारी बबन नथ्थु पाटील यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यासह विविध फौजदारी कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) सखोल उघड चौकशीत भरती प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर शुक्रवारी (दि. 19) रात्री उशिरा मोहाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईमुळे शासकीय भरती प्रक्रियेतील पारदर्शकतेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पदाचा गैरवापर करून नियमबाह्य भरती

एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, बबन पाटील हे डिसेंबर 2015 ते जुलै 2018 या कालावधीत ह्यआत्माह्न प्रकल्प, धुळे येथे प्रकल्प संचालक म्हणून कार्यरत होते. या काळात त्यांनी आपल्या अधिकारांचा गैरवापर करून बीटीएम आणि एटीएम पदांसाठी नियमबाह्य भरती प्रक्रिया राबविली. चौकशीत असे आढळून आले की, नियुक्ती मिळवून



देण्याच्या मोबदल्यात उमेदवारांकडून त्यांच्या आई-वडिलांच्या बँक खात्यांमध्ये 21 नोव्हेंबर 2016 ते 8 डिसेंबर 2016 या कालावधीत 16 लाख 85 हजार रुपये जमा करून घेण्यात आले.

शासन आदेशांना केराची टोपली

राज्य शासनाने करार तत्त्वावरील नियुक्त्या न करण्याचे स्पष्ट आदेश दिलेले असतानाही त्या आदेशांकडे दुर्लक्ष करण्यात आले. संबंधित उमेदवारांना नियमबाह्य पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्याचे चौकशीत स्पष्ट झाले आहे. याहून गंभीर बाब म्हणजे उमेदवारांच्या नियुक्तीसाठी बनावट नियुक्तीपत्रे तयार करण्यात आली. या बनावट कागदपत्रांच्या आधारे गट तंत्रज्ञान व्यवस्थापक आणि सहायक तंत्रज्ञान अधिकारी पदांवर भरती करण्यात आल्याचे चौकशी अहवालात नमूद करण्यात आले आहे.

शासनाची फसवणूक, स्वतःचा आर्थिक फायदा

या संपूर्ण गैरप्रकारातून संशयित बबन पाटील यांनी स्वतःस अनुचित आर्थिक लाभ मिळवून दिल्याचा आरोप आहे. तसेच या कृतीमुळे शासनाचे आर्थिक आणि प्रशासकीय नुकसान झाल्याचेही चौकशीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी मोहाडी पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 मधील कलम 7, 13(1)(क), 13(1)(ड) तसेच भारतीय दंड विधानातील कलम 418, 465, 468, 471 आणि 474 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लाचेची मागणी झाल्यास त्वरित तक्रार करा

दरम्यान, शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयांमध्ये कोणतेही काम करून देण्यासाठी अधिकारी, कर्मचारी किंवा त्यांच्या हस्तकांकडून लाचेची मागणी होत असल्यास नागरिकांनी तत्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागाने केले आहे. यासाठी 1064 हा टोल-फ्री हेल्पलाईन क्रमांक तसेच 7798161064 हा व्हॉट्सॲप क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

'देवभूमीला कचऱ्याने भरू नका'



कैलास पर्वताचे स्थान आणि अनेक ऋषिमुनींच्या तपोभूमीचे क्षेत्र, तसेच अनेक तीर्थक्षेत्रांचे स्थान यांमुळे भारतामध्ये हिमाचल प्रदेशाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळेच हिमाचल प्रदेशाला भारतामध्ये 'देवभूमी' नावाने ओळखले जाते. भारतातीलच नव्हे, तर हिंदु धर्मावर श्रद्धा असलेले जगभरातील भाविक या देवभूमीत येतात. अशी ही देवभूमी भक्ती परंपरेसाठी चर्चेत यायला हवी; परंतु दुर्दैव हे आहे की, मद्यांच्या बाटल्यांचा ढीग आणि अस्वच्छता यांमुळे काही दिवसांपूर्वी हिमाचल प्रदेशाचे नाव चर्चेत आले. हिंदूंच्या देवभूमीच्या अशा प्रकारच्या अवहेलनेविषयी एका विदेशी महिलेने कळकळ व्यक्त केली. एका विदेशी महिलेला हिंदूंच्या तीर्थक्षेत्राच्या विदारक स्थितीविषयी वेदना होतात; परंतु देशातील हिंदूंना त्याविषयी खंत वाटत नाही, हे त्याहून मोठे दुर्दैव! देवभूमीत मद्याच्या बाटल्यांचा खच आणि कचरा पाहून 'देवभूमीला कर्चयाने भरू नका', अशी कळकळीची विनंती या विदेशी महिलेने केली. समस्त हिंदूंसाठी ही स्थिती लाजिरवाणी तर आहेच; परंतु आत्मचिंतन करायला लावणारी आहे. ही स्थिती केवळ हिमाचल प्रदेशाची नाही, तर हिंदूंच्या बहुतांश तीर्थक्षेत्रांची आहे. तीर्थक्षेत्रे आणि धार्मिक स्थळी हिंदू लाखोंच्या संख्येने जातात; परंतु तेथे कसे वागावे, याची जाण किती हिंदूंना असते? याचा विचार केला, तर हिंदूंची आणि हिंदु धमार्ची विदारक स्थिती लक्षात येईल. धार्मिक स्थळी, म्हणजे अगदी जागृत मंदिरांच्या बाहेर पडलेला कचऱ्याचा ढीग, धार्मिक स्थळांच्या ठिकाणी होणारी धक्काबुक्की, सरकारीकरण झालेल्या मंदिरांमध्ये होणारा भ्रष्टाचार, मंदिरांमध्ये तोकड्या कपड्यांनी प्रवेश करणे, मंदिरांच्या जवळ असलेली मद्यालये आणि मांसविक्रीची दुकाने, धार्मिक स्थळांना आलेले पर्यटनस्थळांचे स्वरूप ही हिंदूंच्या अधोगतीची लक्षणे आहेत. हिंदु धर्माच्या ऱ्हासाची जी कारणे आहेत, त्यामध्ये धार्मिक स्थळांविषयी असलेली अनास्था हे एक महत्त्वाचे कारण होय. हिंदूंनी या गोष्टींचा गांभीर्याने विचार केला नाही, तर भविष्यात हिंदूंच्या तीर्थक्षेत्रांची स्थिती अधिकच विदारक होईल. हिंदूंच्या सर्वच तीर्थक्षेत्रांची उणे-अधिक प्रमाणात अशी दुःस्थिती पहायला मिळते. नुकताच अयोध्येतील श्रीरामजन्मभूमीतील श्रीराममंदिराच्या दानपेटीमध्ये चोरी झाल्याचा प्रकार उघड झाला. या चोरीचा छडा लावण्यासाठी उत्तरप्रदेश सरकारकडून विशेष अन्वेषण पथकाची स्थापना करण्यात आली आहे. यातून सत्य प्रकार उघडकीस येईल, अशी आशा आहे; परंतु ही स्थिती काही चांगली नव्हे. महाराष्ट्रात मुंबईतील श्री सिद्धिविनायक मंदिर, अहिल्यानगर जिल्ह्यातील श्री शनैश्वर देवस्थान, कोल्हापूरमधील श्री महालक्ष्मीदेवीचे मंदिर, महाराष्ट्राची कुलदेवता श्री तुळजाभवानीदेवीचे मंदिर अशा जागृत देवस्थानांमध्ये भ्रष्टाचार झाला असून त्याविषयी अन्वेषण चालू आहे. यांतील बहुतांश प्रकरणांमध्ये तर मंदिरांमध्ये घोटाळे करणारे त्या त्या मंदिरांचे विश्वस्तच असल्याचे आढळून येत आहे. यातून परिस्थिती कधीच हाताबाहेर गेली आहे, हे लक्षात घ्यायला हवे. मंदिरात अर्पण केलेल्या, म्हणजे भगवंताच्या धनावर विश्वस्तच डल्ला मारत आहेत. अन्वेषणाच्या नावाखाली वर्षानुवर्षे हे खटले न्यायालयात चालू आहेत. या आरोपींना राजकारणी पाठीशी घालत आहेत. अशी हिंदूंच्या तीर्थक्षेत्रांची केविलवाणी स्थिती आहे, म्हणजे केवळ मंदिराचा परिसर अस्वच्छ, मद्यालये-मांसाची दुकाने यांनी अपवित्र होत आहे, असे नाही, तर थेट आता मंदिरांमध्येच अपप्रकार चालू आहेत आणि एवढे होऊनही हिंदु समाज निद्रिस्त आहे. ही परिस्थिती निश्चितच हिंदूंना विचार करायला भाग पाडणारी आहे. ही परिस्थिती पालटायची असेल, तर या परिस्थितीला कोण कारणीभूत आहे? याच्या मुळापर्यंत जाऊन त्यावर उपाययोजना काढणे आवश्यक आहे. हिंदूंची तीर्थक्षेत्रे ही केवळ देशाच्या संस्कृतीचेच नव्हे, तर हिंदु धर्माचे प्रतिनिधीत्व करतात. तीर्थक्षेत्रे, म्हणजे हिंदु धर्माचे शक्तीस्रोत आहेत. ज्याप्रमाणे केंद्रबिंदूमुळे वर्तुळाचा परिघ पूर्ण होतो, त्याचप्रमाणे मंदिरे आणि तीर्थक्षेत्रे ही हिंदु धर्माचा केंद्रबिंदू आहे. समस्त हिंदूंचे आणि हिंदु धर्माचे ते संरक्षककवच आहेत. राष्ट्र पारतंत्र्यात असेल, तर ते स्वतंत्र करण्याची प्रेरणा हिंदूंच्या धर्मग्रंथांतून आणि त्यासाठी लागणारी शक्ती या धर्मस्थळांतूनच मिळते. त्यामुळे या धर्मस्रोतांवरील आक्रमण, म्हणजे हिंदूंना बलहीन करण्याचा प्रयत्न आक्रमकांनी केला. मोगलांनी आक्रमण करतांना प्रथम हिंदूंची मंदिरे तोडली आणि धर्मग्रंथ जाळले. ब्रिटिशांनी त्याही पुढे जाऊन हिंदूंना धर्मशिक्षणच मिळू नये, यासाठी मेकॉले शिक्षणपद्धत निर्माण केली. मोगलांच्या तोडफोडीच्या काळातही हिंदूंना धर्मशिक्षण देणारी व्यवस्था अस्तित्वात होती; परंतु ब्रिटिशांनी ही व्यवस्थाच नष्ट केली. मेकॉले शिक्षणपद्धतीतून शिक्षण घेतलेल्या हिंदूंच्या २ पिढ्या जाऊन आता तिसरी पिढी येऊ घातली आहे. हिंदु धर्माच्या ऱ्हासाचे मूळ यामध्येच आहे. हिंदूंची पुढील पिढीही धर्मशिक्षणापासून वंचित राहिली, तर मात्र हिंदु धर्माचा आणखी ऱ्हास होईल. त्यामुळे येणाऱ्या काळात भारतीय शिक्षणपद्धतीत हिंदु धर्म आणि संस्कृती यांचे शिक्षण मिळेल, अशी व्यवस्था करणे अनिवार्य झाले आहे. मुळात भारतासारख्या हिंदूबहुल राष्ट्रात शासकीय शाळांतूनच हिंदूंना धर्मशिक्षण मिळणे, हा त्यांचा धार्मिक अधिकार आहे. प्रत्येक देशाची राज्यघटना तेथील बहुसंख्यांकांच्या हिताचे आणि संस्कृतीचे रक्षण करणारी असते. भारतात मात्र राज्यघटना बहुसंख्यांक हिंदूंऐवजी अल्पसंख्यांकांच्या धार्मिक हिताच्या रक्षणाला झुकते माप देणारी आहे. यामध्ये पालट होणे आवश्यक आहे. सर्वधर्मसमभावाच्या नावाखाली बहुसंख्य समाजाला धर्मशिक्षणापासून वंचित ठेवणे, हाच मुळात त्या संस्कृतीवर आघात आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतर हिंदूंना दुय्यम वागणूक देत काँग्रेसने असे अनेक आघात हिंदूंवर केले. हिंदूंचे राजकीय क्षेत्रात प्रतिनिधीत्व करणाऱ्या भाजपने देशात हिंदुहिताचे रक्षण करणारी व्यवस्था निर्माण करण्याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. तीर्थक्षेत्रांचे पावित्र्य न राखणे, हा एक भाग आहे. मुळात धमार्चेच महत्त्व नसल्यामुळे हिंदु समाज धर्मावरील विविध आघातांविषयी निष्क्रीय आहे. धर्मशिक्षणामुळेच हिंदूंमध्ये धर्माभिमान निर्माण होईल आणि धर्माभिमान निर्माण झालेला हिंदूच धर्मरक्षणाकरता पुढे येईल, हे सूत्र लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे हिंदुहिताचे रक्षण करणारी प्रणाली कार्यरत होण्याकडेच हिंदूंनी प्राधान्य देणे आवश्यक आहे. धर्मावरील आघातांविषयी हिंदू जागृत होत आहेत; मात्र त्यांच्यामध्ये अद्यापही धर्मशिक्षणाचा अभाव आहे. धर्माचे ज्ञान प्राप्त झाल्यास साधना आणि धर्माभिमान यांचा संगम असलेला हिंदु समाज अधिक तेजस्वी कार्य करू शकेल. यासाठी येणाऱ्या काळात पुस्तकी ज्ञानासह हिंदु धर्मशास्त्र प्रत्येक हिंदूपर्यंत पोचवण्यावर हिंदुत्वनिष्ठ संघटना आणि धार्मिक संस्था यांनी भर देणे आवश्यक आहे.

जनादेशाचा बाजार, संविधानावर घाव



महाराष्ट्रातील आणि देशातील अलीकडील घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आज एक मूलभूत प्रश्न आपल्यासमोर उभा आहे तो म्हणजे आपण लोकशाही अधिक मजबूत करणार आहोत की ह्यऑपरेशनह्णच्या राजकारणातून तिचे वस्त्रहरण होत असताना मूक प्रेक्षक बनून राहणार आहोत?

लोकशाही ही केवळ निवडणुकांची प्रक्रिया नसते; ती जनतेने व्यक्त केलेल्या विश्वासाची आणि जनादेशाच्या पवित्रतेची व्यवस्था असते. मतदार आपल्या मताच्या माध्यमातून केवळ एखाद्या व्यक्तीला निवडून देत नाहीत, तर विशिष्ट विचारसरणी, धोरणे, नेतृत्व आणि राजकीय कार्यक्रमालाही मान्यता देत असतात. त्यामुळे निवडणुकीनंतर जनतेने दिलेल्या कौलाचा सन्मान राखणे ही प्रत्येक लोकप्रतिनिधी आणि राजकीय पक्षाची नैतिक तसेच संविधानिक जबाबदारी असते. परंतु जेव्हा पैसा, सत्तेच्या लालसेपोटी, पदांच्या मोहापायी आणि इतर प्रलोभनांच्या आधारे निवडून आलेल्या प्रतिनिधींची फोडाफोड केली जाते, तेव्हा हा लोकशाहीच्या आत्म्यावर घातलेला कठोर घाव असतो.

महाराष्ट्रात गेल्या काही वर्षात घडलेल्या राजकीय घडामोडी आणि सध्या चर्चेत असलेले 'ऑपरेशन टायगर' हे याच चिंताजनक प्रवृत्तीचे प्रतीक आहे. निवडणुकीच्या वेळी एका विचारसरणीच्या, आघाडीच्या नावावर मते घेऊन निवडून यायचे त्यानंतर प्रचंड पैसा घेऊन विरुद्ध विचारांच्या सत्ताधारी पक्षाच्या वळचणीला जाऊन सत्तेचा मलिदा खायचा, हा केवळ पक्षांतराचा प्रश्न नाही. ही फक्त जनादेशाशी केलेली प्रतारणा नसून मतदारांच्या पाठीत खंजीर खुपसून लोकशाहीला बाजारपेठेत रूपांतरित करण्याचा धोकादायक प्रयत्न आहे.

लोकशाही की 'ऑपरेशन' संस्कृती?

गेल्या काही वर्षांत भारतीय राजकारणात 'ऑपरेशन' नावाचा एक नवीन शब्दप्रयोग रूढ झाला आहे. कधी 'ऑपरेशन लोटस', तर कधी 'ऑपरेशन टायगर'च्या नावाखाली अनैतिक मार्गाने सत्तेची गणिते बदलण्यासाठी असंविधानिक मोहिमा राबविल्या जातात. कर्नाटक, मध्य प्रदेश, गोवा, अरुणाचल प्रदेश, मणिपूर आणि महाराष्ट्र यांसारख्या राज्यांमध्ये निवडणुकांनंतर आमदार-खासदारांच्या फोडाफोडीतून सत्तांतर झाल्याची उदाहरणे देशाने पाहिली आहेत. लोकशाहीत सरकारे जनतेच्या मतांनी बदलली पाहिजेत; ती जर अनैतिक, असंविधानिक राजकीय व्यवहारांनी बदलत असतील तर निवडणुकांना आणि लोकशाहीला अर्थच उरत नाही. जर निवडणुकीनंतर काही लोकप्रतिनिधींना कोट्यवधी रुपयांत खरेदी करून जनादेशाचे गणित बदलता येत असेल, तर निवडणुका घेण्याचे औचित्य काय? मतदानासाठी रांगेत उभ्या राहणाऱ्या सामान्य नागरिकाच्या मताचे मूल्य काय?

दहावी अनुसूची : जनादेशाच्या संरक्षणासाठीचा कायदा

पक्षफोडीचे राजकारण रोखण्यासाठी आणि जनतेने दिलेल्या कौलाचे संरक्षण करण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली १९८५ मध्ये संविधानात दहावी अनुसूची अर्थात पक्षांतरबंदी कायदा समाविष्ट करण्यात आला. १९६० आणि ७० च्या दशकात वाढलेल्या 'आयाराम-गयाराम' संस्कृतीमुळे निवडून आलेली सरकारे अस्थिर होत होती आणि लोकशाही संस्थांवरील जनतेचा विश्वास डळमळीत होत होता. या पार्श्वभूमीवर जनादेशाचा सन्मान राखणे आणि लोकप्रतिनिधींची खरेदी-विक्री रोखणे हा या कायद्याचा मूलभूत उद्देश होता. मात्र गेल्या काही वर्षांतील राजकीय घडामोडींमुळे पक्षांतरबंदी कायद्याच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. राज्यपाल, विधानसभा अध्यक्ष, लोकसभा अध्यक्ष यांसारख्या घटनात्मक पदांवरून दिल्या जाणाऱ्या निर्णयांतील विलंब, अपात्रतेच्या प्रकरणांवर कारवाई न होणे आणि न्यायालयीन प्रक्रियेचा प्रदीर्घ कालावधी यामुळे जनादेशाचे संरक्षण करण्याऐवजी चोरीला मोकळे रान दिले जात आहे.

इतिहासाचे इशारे

भारतीय राजकारणात पक्षफोडीची परंपरा नवीन नाही. १९६७ मध्ये हरयाणातील आमदार गया लाल यांनी एका दिवसात तीन वेळा पक्ष बदलल्याने 'आयाराम-गयाराम' हा शब्द भारतीय राजकारणात प्रसिद्ध झाला. त्यानंतर अनेक राज्यांतील सरकारे आमदारांच्या फोडाफोडीतून कोसळली. या अनुभवांतूनच पक्षांतरबंदी कायद्याची निर्मिती झाली. परंतु आजची परिस्थिती अधिक गंभीर आहे. पूर्वी काही आमदार पक्ष बदलत असत; आता संपूर्ण पक्षच चोरला जातो. असंविधानिक अनैतिक मार्गांनी नाव, चिन्ह यांची मालकी मिळवली जाते.

लोकशाहीचे वस्त्रहरण

महाभारतातील द्रौपदी वस्त्रहरण हा केवळ एका स्त्रीच्या अपमानाचा प्रसंग नव्हता. तो सत्ता, अहंकार आणि नैतिक अधःपतनाच्या पराकाष्ठेचे प्रतीक होता. त्या वेळी सभागृहात अनेक ज्येष्ठ, विद्वान आणि सामर्थ्यवान व्यक्ती उपस्थित होते, पण ते अन्यायाविरोधात उभे राहिले नाहीत. त्यांच्या मौनामुळे अन्यायाला बळ मिळाले. आजही तीच परिस्थिती आहे. जनादेशाची पायमल्ली होत असताना संविधानिक संस्थांची भूमिका, निर्णय प्रक्रियेतील विलंब आणि राजकीय नैतिकतेच्या अभावामुळे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत राजकीय वास्तव बदललेले असते. लोकशाहीला सर्वात मोठा धोका एखाद्या एका निर्णयातून नसतो, तर संस्थांच्या मौनातून, नैतिकतेच्या ऱ्हासातून आणि नागरिकांच्या उदासीनतेतून निर्माण होतो.

न्यायालयाच्या विलंबाने फुटीला बळ

महाराष्ट्रातील अलीकडील राजकीय घडामोडींनी पुन्हा एकदा जनादेश, राजकीय निष्ठा आणि लोकशाहीच्या स्थैर्याबाबत प्रश्न निर्माण केले आहेत. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सहा खासदार फुटले. या पक्षात सत्ताधाऱ्यांनी दुसऱ्यांदा फूट पाडली. पहिल्या फुटीबाबत अद्याप कोटार्ने निकाल दिलेला नाही तोपर्यंत ही दुसरी फूट आहे. पहिल्या प्रकरणाचा निकाल आला असता तर दुसऱ्या फुटीला बळ मिळाले नसते. लोकशाहीत विरोधी पक्ष हा जनतेच्या प्रश्नांना आवाज देणारा अत्यावश्यक घटक असतो. परंतु विरोधी पक्षांच्या लोकप्रतिनिधींना कोट्यवधी रुपये खर्च करून खरेदी करणे आणि त्यांचे अस्तित्व संपवणे हे जर यशस्वी राजकारणाचे मापदंड बनले, तर ती लोकशाही राहात नाही.

फक्त जनादेशाचा नाही जनतेचा अपमान


लोकशाहीत प्रत्येक लोकप्रतिनिधीला स्वतःची भूमिका बदलण्याचा अधिकार आहे. परंतु हा अधिकार जनतेने दिलेल्या जनादेशापेक्षा मोठा असू शकत नाही. मतदार केवळ व्यक्तीला मतदान करत नाहीत; ते पक्ष, विचारसरणी आणि नेतृत्वालाही समर्थन देत असतात. शिवसेनेच्या सहा फुटीर खासदारांना काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या मतदारांनी मतदान केलेले आहे. या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्यांचा प्रचार केला आहे. त्यामुळे त्यांनी पक्ष बदलताना नैतिकदृष्ट्या राजीनामा देऊन पुन्हा निवडणुकीला सामोरे गेले पाहिजे. एवढी एवढी नैतिकता आणि धाडस त्यांच्यात नाही.

लोकशाही वाचवायची की केवळ सत्ता?

आजचा प्रश्न कोणत्या एका पक्षाचा नाही. तो भारतीय लोकशाहीच्या भविष्याचा आहे. जर निवडणुकांनंतर कोट्यवधी रुपयांत आमदार-खासदारांची खरेदी, पक्ष, चिन्ह यांची चोरी हीच नवी राजकीय संस्कृती बनली, तर लोकशाहीवरील जनतेचा विश्वास संपेल. मतदारांनी दिलेला कौल हा अंतिम लोकशाही निर्णय न राहता, शेअर बाजारातील समभागाप्रमाणे विकत घेता आणि विकता येणारी वस्तू बनण्याचा धोका निर्माण होईल. अशा परिस्थितीत निवडणूक ही जनतेच्या सार्वभौम इच्छेची अभिव्यक्ती न राहता सत्तेच्या सौद्यांचा एक औपचारिक कार्यक्रम ठरेल.

लोकशाहीची खरी ताकद निवडणुकीत नसते; ती जनादेशाच्या सन्मानात असते. सत्ता मिळवणे हे राजकारणाचे उद्दिष्ट असू शकते, परंतु लोकशाहीचे संरक्षण करणे ही राजकीय पक्ष, लोकप्रतिनिधी आणि घटनात्मक संस्थेची जबाबदारी आहे. देशातील अलीकडील घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आज एक मूलभूत प्रश्न आपल्यासमोर उभा आहे तो म्हणजे आपण लोकशाही अधिक मजबूत करणार आहोत की 'ऑपरेशन'च्या राजकारणातून तिचे वस्त्रहरण होत असताना मूक प्रेक्षक बनून राहणार आहोत?

विकासाच्या धुळीत गुदमरलेली शहरे



विकास प्रक्रियेत उडणारी धूळ आता गंभीर सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न ठरत आहे. यातून आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होत असून, त्याचा सर्वाधिक फटका बांधकाम क्षेत्रातील कामगारांना बसत असल्याचे दिसून येते.

राज्यात मोठ्या प्रमाणात शहरीकरण सुरू असल्याने शहरांकडे होणारे स्थलांतर वाढले आहे. शहरांत घरनिर्मिती आवश्यक ठरत आहे. सध्या सर्वत्र सोसायट्यांच्या पुनर्विकासाची कामे तसेच नवीन लहान मोठे गृहनिर्माण प्रकल्प सुरू आहेत. तसेच महापालिकेमार्फत अनेक काँक्रीट रस्त्यांची कामे सुरू आहेत. भुयारी गटारांची कामे व देखभाल सुरू असल्याने अनेक ठिकाणी रस्ते खोदण्यात आल्याचे दिसून येते. वाहनांच्या पार्किंगसाठी अनेक गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये तळघरांची निर्मिती करण्यात येत असून त्यासाठी मोठ्या प्रमाणात माती खोदकाम आणि माती वाहतूक केली जात आहे.

बांधकाम म्हटले की माती खुदाई होणारच. काँक्रीटची वाहतूक ट्रान्झिट मिक्सरद्वारे केली जाते. सिमेंट, वाळू आणि खडी यांची वाहतूक करावी लागते. इमारत बांधकामात सिमेंटसह निर्माण होणारी सूक्ष्म धूळ वाऱ्यासोबत परिसरात पसरते. काही ठिकाणी काँक्रीट ग्राइंडिंगची कामे चालू असतात, त्यामुळे सिमेंट डस्ट पुन्हा वातावरणात मिसळते. काही ठिकाणी आगाऊ जमा झालेले काँक्रीट तोडले जाते. इमारतींमध्ये टाइलिंग करताना मोठ्या प्रमाणात डेब्रिज तयार होते आणि ते गार्बेज टनेलमधून खाली फेकले जाते. खुदाईनंतर मातीची शहराबाहेर वाहतूक करताना ती डम्परमधून आजूबाजूला पसरते. एकंदर बांधकाम प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर धूळ निर्माण होत असते. पावसाळ्यात हीच माती आणि बांधकामातील अवशेष गटारांमध्ये जाऊन पाणी निचरा व्यवस्थेवर ताण आणतात आणि अनेक भागांत पाणी साचण्याच्या समस्या निर्माण होतात.

बांधकाम प्रक्रियेदरम्यान निर्माण होणारे ध्वनिप्रदूषणही तितकेच गंभीर आहे. ड्रिलिंग, पाइलिंग, ब्रेकर मशीन, भुयारी मार्ग खोदणारी मशीन्स आणि काँक्रीट मिक्सरमधून निर्माण होणारा मोठा आवाज विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर, रुग्णालय परिसरातील रुग्णांवर तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करत आहे. भुयारी मार्ग खोदकाम करताना खूप मोठ्या प्रमाणात माती व दगडांची वाहतूक करण्यात येत असल्याने धुळीचे प्रमाण वाढत चालले आहे.

मुंबईसह अन्य शहरांमध्ये सुरू असलेल्या वेगवान बांधकामांनी शहरांचे रूप बदलले असले, तरी या विकास प्रक्रियेत उडणारी धूळ (कन्स्ट्रक्शन डस्ट) आता गंभीर सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न ठरत आहे. रस्ते रुंदीकरण, मेट्रो प्रकल्प, उंच इमारती, पुनर्विकास आणि पायाभूत सुविधांच्या कामांतून हवेत मिसळणारी सिमेंट, वाळू, चुनखडी आणि धातूंची सूक्ष्म धूळ श्वसनमागार्तून थेट मानवी शरीरात प्रवेश करत आहे. यातून आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होत असून, त्याचा सर्वाधिक फटका बांधकाम क्षेत्रातील कामगारांना बसतो.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार, शहरी भागांतील पीएम १० आणि पीएम २.५ प्रदूषणात बांधकाम क्षेत्राचा वाटा ३० ते ४० टक्क्यांपर्यंत आहे. ही सूक्ष्म कणधूळ फुफ्फुसांमध्ये खोलवर साचते. पीएम २.५ कणांचा आकार २.५ मायक्रॉनपेक्षा कमी असल्याने ते रक्तप्रवाहातही प्रवेश करू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेने स्पष्ट केले आहे की, दीर्घकाळ या कणांच्या संपर्कात राहिल्यास दमा, क्रॉनिक ब्रॉन्कायटिस, हृदयविकार, स्ट्रोक तसेच अकाली मृत्यूचा धोका वाढतो.

भारतातील आयसीएमआर आणि जीबीडी (ग्लोबल बर्डन ऑफ स्टडीज) अभ्यासानुसार, वायुप्रदूषणामुळे होणाऱ्या आजारांमुळे देशात दरवर्षी १५ ते १६ लाखांहून अधिक अकाली मृत्यू होतात. यातील मोठा हिस्सा शहरी बांधकाम-संबंधित धुळीशी जोडलेला असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. मुंबई, दिल्ली, पुणे, बेंगळुरू यांसारख्या शहरांमध्ये हिवाळ्यात व कोरड्या हंगामात बांधकामस्थळांजवळील पीएम १० पातळी परवानगीपेक्षा दुपटीने वाढली आहे.

बांधकाम प्रकल्पावर निर्माण होणाऱ्या धुळीचा सर्वाधिक फटका बांधकाम कामगार, रस्त्यालगत राहणारे नागरिक, वृद्ध, लहान मुले आणि दमा किंवा हृदयविकार असलेल्या रुग्णांना बसतो. मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या निरीक्षणानुसार, गेल्या काही वर्षांत श्वसनविकारासाठी बाह्यरुग्ण विभागात येणाऱ्या रुग्णसंख्येत २० ते २५ टक्क्यांची वाढ दिसून आली आहे. डोळ्यांची जळजळ, त्वचारोग, सतत खोकला, केस गळती आणि श्वासोच्छ्वासाचा त्रास ही लक्षणे सामान्य होत चालली आहेत. बांधकाम कामगारांसाठी नियमित फुफ्फुस तपासणी, आरोग्य विमा, दर्जेदार मास्क आणि सुरक्षितता प्रशिक्षण अनिवार्य करण्याची गरज आहे.

नियमांनुसार बांधकामस्थळी पाणी फवारणी, हिरवे जाळे (ग्रीन नेट), बांधकाम साहित्य झाकणे, वाहतूक करताना ट्रक कव्हर करणे आणि मलबा शास्त्रीय पद्धतीने हटवणे बंधनकारक आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या उपाययोजना कागदापुरत्याच मर्यादित राहतात. सीपीसीबी आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळांनी वारंवार इशारे दिले असले तरी अंमलबजावणीतील ढिलाईमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे.

तज्ज्ञांच्या मते, बांधकाम परवाना देताना पर्यावरण व्यवस्थापन आराखडा सक्तीचा करणे, उल्लंघनांवर कठोर दंड आकारणे, कामगारांसाठी मास्क व आरोग्य तपासणी अनिवार्य करणे, तसेच नागरिकांच्या तक्रारींसाठी तत्काळ कारवाई यंत्रणा उभारणे गरजेचे आहे. जगातील अनेक विकसित शहरांमध्ये डस्ट मॉनिटरिंग सेन्सर, अँटी-स्मॉग गन, व्हॅक्युम रोड स्वीपर तसेच प्रीकास्ट आणि रेडीमिक्स तंत्रज्ञानाचा वापर करून बांधकामातील प्रदूषण कमी करण्यावर भर दिला जात आहे. शहरांचा विकास आवश्यक असला, तरी तो नागरिकांच्या श्वासावर गदा आणून होऊ नये, ही जाणीव धोरणकर्ते, बांधकाम व्यावसायिक आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे स्वीकारण्याची वेळ आली आहे. न्यायालयांकडूनही याबाबत वेळोवेळी ताशेरे ओढले जात असताना किरकोळ मलमपट्टी आणि आदेशांचे कागदी घोडे नाचविण्यापलीकडे ठोस कारवाई होताना दिसत नाही.

बांधकाम प्रकल्पांवर खालील उपाययोजना प्रभावीपणे राबवल्यास मानवी आरोग्य अधिक सुरक्षित आणि निरोगी राहू शकेल :

१) सर्व बांधकाम प्रकल्पांच्या चहुबाजूंनी इमारतीच्या बांधकामासोबतच ग्रीन पडदा उभारून त्यावर पाणी फवारणी
२) खोदकामातून निर्माण होणाऱ्या मातीची वाहतूक करताना डम्परवर प्लास्टिक कव्हर किंवा लॅमिनेशन
३) बांधकाम परिसरालगतच्या रस्त्यांवर साचणाऱ्या धुळीवर दररोज पाणी फवारणी करून साफसफाई
४) प्रकल्पाच्या बाहेर रस्त्यावर वाळू, सिमेंट तसेच खडी उघड्यावर टाकण्यास सक्त मनाई
५) इमारत बांधकामासाठी तसेच पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी प्रीकास्ट तंत्रज्ञानाचा वापर
६) काँक्रीट बॅचिंग प्लांटच्या सभोवती पत्र्याच्या बॅरिकेडिंगसहित किमान २५ फूट उंचीचा हिरवा पडदा उभारून त्यावर पाणी फवारणी
७) शाळा, महाविद्यालये आणि रुग्णालय परिसरातील बांधकाम प्रकल्पांसाठी नियमांची कठोर अंमलबजावणी केली पाहिजे.

विकासाची गती महत्त्वाची असली, तरी नागरिकांचा श्वास गुदमरवून होणारा विकास हा शाश्वत ठरू शकत नाही. शहरांच्या प्रगतीसोबत पर्यावरणीय आणि आरोग्यदृष्ट्या जबाबदार बांधकाम संस्कृती रुजविणे हीच काळाची खरी गरज आहे. शहरांचा विकास उंच इमारतींनी तसेच पायाभूत सुविधांनी नव्हे, तर नागरिकांच्या निरोगी श्वासांनी मोजला गेला पाहिजे.



अमेरिकेबरोबर करार करताना आपल्या आर्थिक, सामरिक आणि शेतीविषयक हितसंबंधांचे रक्षण करण्याचे आव्हान भारतासमोर आहे.

बर्फ वितळू लागला...

फ्रान्समधील 'जी-७' या प्रगत देशांच्या शिखर परिषदेच्या दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात झालेली चर्चा ही दोन्ही देशांतील संबंधांमधील तणाव दूर करण्यास उपयुक्त ठरू शकेल. या भेटीत ट्रम्प यांनी भारतावर आणि व्यक्तिशः मोदींवर स्तुतिसुमने उधळली; तसेच भारतावर हल्ला झाल्यास अमेरिका मदतीला धावून येईल, असे आश्वासनही दिले. मात्र, उद्या चीन किंवा पाकिस्तान यांनी भारतावर हल्ला केल्यास अमेरिका खरोखरीच मदतीला धावून येईल का, असा प्रश्न आहे. तसेही ट्रम्प यांच्या उक्तीत आणि कृतीत नेहमीच अंतर असते; त्यामुळे मोदींना आणि भारताला सुखावणारी वक्तव्ये त्यांनी केली असली, तरी आयातशुल्कापासून 'एचवन बी' व्हिसापर्यंत अनेक मुद्द्यांवरील ट्रम्प प्रशासनाची भारताबाबतची कठोर भूमिका लगेचच बदलेल, असे नाही. पंतप्रधान मोदी यांच्याशी वाटाघाटी करणे सोपे नसल्याचे उद्गार ट्रम्प यांनी काढले. प्रत्यक्षात ट्रम्प यांच्याशी वाटाघाटी करणे सोपे नसल्याचा अनुभव आहे. कोणताही करार करताना राष्ट्रप्रमुख आपल्या देशाच्या वाट्याला काय येईल हे पाहत असतो; परंतु अमेरिकेला पुन्हा महान बनविण्याच्या कल्पनेने पछाडलेले ट्रम्प आपल्या पदरात अधिकाधिक पाडून घेण्याच्या प्रयत्नात आहेत. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार कराराची प्रक्रिया दीर्घ काळ लांबण्याचे कारणही हेच आहे. अमेरिकी शेतीमालाला भारतीय बाजारपेठ खुली करण्यापासून भारताच्या इंधनखरेदीचा प्राधान्यक्रम बदलण्यापर्यंतचे मुद्दे या करारात असल्याने उभयपक्षी मान्य असा तोडगा अद्याप निघालेला नाही. मात्र, तो दृष्टिपथात असल्याचे संकेत मोदी-ट्रम्प यांच्या भेटीत दिले गेले. दक्षिण कोरिया, जपान आदी घट्ट मैत्री असलेल्या देशांबरोबरील व्यापार करारांत, या दोन्ही देशांनी अमेरिकेत मोठी गुंतवणूक करण्याला आणि इंधनाच्या खरेदीला मान्यता दिली होती. मोदी-ट्रम्प यांच्या भेटीला ताजी पार्श्वभूमी होती, ती पश्चिम आशियातील युद्धाची. या युद्धाची समाप्ती झाली असून, अमेरिका आणि इराण सहमती करारावर आता सह्या करतील. या युद्धाचा फटका अन्य देशांप्रमाणे भारताला बसलाच; सोबत जीवितहानीही सहन करावी लागली. होर्मुझच्या सामुद्रधुनीत अमेरिकेच्या क्षेपणास्त्र हल्ल्यात भारतीय जहाजावरील तिघांचा मृत्यू झाला. त्यावर देशात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. त्याबद्दल अमेरिकेने ना दिलगिरी व्यक्त केली, ना खंत. मोदींबरोबरील भेटीतही ट्रम्प यांनी याबाबत खंत व्यक्त केली नाही. होर्मुझच्या सामुद्रधुनीतील सागरी प्रवाशांच्या सुरक्षिततेबद्दलची चिंता पंतप्रधान मोदींनी ट्रम्प यांच्यासमोर उपस्थित केली. त्यावरील ट्रम्प यांची प्रतिक्रिया खेद दर्शविणारी नव्हती. मात्र, अमेरिकी परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांच्याप्रमाणे त्यांनी या प्रकरणी कठोर वक्तव्य केले नाही. अमेरिकी निर्बंधांचे उल्लंघन करून होणारी बेकायदा कृत्ये सहन केले जाणार नसल्याचे रुबियो यांनी म्हटले होते. आपण आठ युद्धे थांबविल्याचा दावा ट्रम्प

मलाई कोफ्ता

साहीत्य :

कोफ्ता आवरणासाठी:

- ३ मध्यम बटाटे
- २ टेस्पून कॉर्न फ्लोर
- चवीपुरते मीठ (१/४ चमचा)
- तळणीसाठी तेल

सारणासाठी:

- १/२ कप किसलेले पनीर
- २ चिमटी मीठ
- १/२ टीस्पून साखर
- १ हिरवी मिरची, बारीक चिरून
- २५ बेदाणे
- २ टीस्पून बारीक चिरलेली कोथिंबीर

ग्रेव्हीसाठी:

- १ मोठा पांढरा कांदा, मधोमध अर्धा चिरून सोलून घ्यावा
- २ टीस्पून बटर
- २ हिरव्या मिरच्या
- ३ मोठ्या लसणीच्या पाकळ्यांची पेस्ट
- १/२ टीस्पून आलेपेस्ट
- अख्खा गरम मसाला:- २ तमालपत्र, २-३ लवंग, ३ मिरी दाणे, १ लहान दालचीनी, २ वेलची
- २ टेस्पून दाटसर काजूपेस्ट
- १/२ कप हाफ अँड हाफ
- चवीपुरते मीठ

कृती :

- बटाटे उकडून घ्यावेत. सोलून व्यवस्थित मॅश करून घ्यावेत. गुठळी अजिबात राहू देवू नये. यामध्ये २ टेस्पून कॉर्न फ्लोर आणि चवीपुरते मीठ घालून मळून घ्यावे. या मिश्रणाचे साधारण ८ समान भाग करावेत.
- सारणाचे सर्व जिन्नस एकत्र करून मिक्स करावे. याचेही ८ समान भाग करावेत.
- बटाट्याचे मिश्रण घेउन हातानेच चपटे करून पारी तयार करावी (साधारण अडीच ते ३ इंच). मधोमध सारण ठेवून सर्व कडा एकत्र आणाव्यात आणि सीलबंद करावे. अशाप्रकारे सर्व कोफ्ते तळण्यासाठी तयार करावेत. कोफ्त्याचा सरफेस एकदम स्मूथ असावा. भेग पडली असेल तर नीट बंद करावी. कारण तळताना सारण बाहेर येउन कोफ्ता फुटतो.
- सर्व कोफ्ते मध्यम आचेवर गोल्डन रंगावर तळून घ्यावे. टिपकागदावर काढून ठेवावे.

ग्रेव्ही: कांदा उकडून घ्यावा. (मी प्रेशर कुकरमध्ये २ शिट्ट्या करून कांदा उकडला होता). उकडलेल्या कांद्याची बारीक पेस्ट करावी.

- पॅनमध्ये बटर गरम करून त्यात अख्खे गरम मसाले घालावेत. नंतर हिरवी मिरची आणि आलेलसूण पेस्ट घालावी. १५ सेकंद परतावे. आता कांद्याची पेस्ट आणि मीठ घालून हाय हिटवर परतावे. जोवर रंग किंचित गुलाबी होईतोवर सतत ढवळावे.
- काजू पेस्ट घालावी. तळापासून ढवळत राहावे, कारण काजू पेस्ट तळाला चिकटू शकते. किंचित पाणी घालावे. झाकण ठेवून काजूचा कच्चट वास जाईस्तोवर मध्यम आचेवर शिजवावे (३ ते ४ मिनिटे)
- आच एकदम कमी करावी आणि उष्णता थोडी कमी होईस्तोवर थांबावे. आता हाफ अँड हाफ घालून जोरजोरात ढवळावे. कारण कांदा आणि मीठ यामुळे हाफ अँड हाफ फुटण्याची शक्यता असते. एकदा का व्यवस्थित मिक्स झाले कि आच मिडीयम वर ठेवावी आणि काही मिनिटे शिजवावे.



केसांच्या सुंदरतेसाठी आपण काय नाही करत.. स्पा, तेलाने मॉलिश आणि वेगवेगळे सौंदर्य प्रसाधने देखील वापरात आहात. परंतु काही आहार आपल्या केसांच्या सौंदर्यतेला आणि बळकटीला परत मिळवून देऊ शकतात. ते ही कुठल्याही प्रकाराचा त्रास न घेता. जाणून घेउया हे 5 आहार ज्यांचा सेवनाने आपल्या केसांच्या समस्यांचं निरसन होऊ शकतं.

मजबूत केसांसाठी आहारात सामील करा या वस्तू



पालक:

पालक खाणं फायदेशीर असतं. आरोग्याबरोबरच हे आपल्या केसांच्या गळतीला ही थांबवत. यात मुबलक प्रमाणात आयरन (लोखंड) मुबलक आढळल्यामुळे केसांसाठी हे वरदान ठरतं.



गाजर :

लाल गोड गाजर चवी बरोबरच आपल्याला चांगले आरोग्य आणि सौंदर्य देखील देतं. तसेच हे व्हिटॅमिन ए चे चांगले स्त्रोत आहे. त्याच बरोबर यामध्ये असलेले कॅरोटीन आपल्या केसांना आणि डोळ्यांना सुरक्षित आणि सुंदर ठेवतं. आपल्या केसांना मूळापासून हे बळकट करत.

दही:

दही खाल्याने देखील केसांची गळती थांबते. केस सुंदर आणि चमकदार बनतात. यामध्ये असलेले व्हिटॅमिन बी 6 आणि व्हिटॅमिन डी आपल्या केसांना नवे चैतन्य आणि चांगले आयुष्य देतं.

रताळे :

ह्याला गोड बटाटा देखील म्हणतात. यात व्हिटॅमिन ए मुबलक प्रमाणात आढळतं. जे आपल्या केसांना बळकट करून केसांची गळती थांबवतं. आपल्या मुळांमध्ये आढळणारं तेल देखील सुरक्षित ठेवतं. जेणे करून आपल्या केसांना पोषण मिळतं.

बेदाणे :

आपल्या केसांची वाढ होत नसल्यास काळजी करु नये. बेदाणे खाल्याने आपल्या केसांची जलद गतीने वाढ होते. यामध्ये आयरन(लोखंड) आणि मिनरल्स (खनिजे) मुबलक प्रमाणात असतात. जे आपल्या केसांना पोषण देतं.

हिरव्या भाज्यांमध्ये आपल्याकडे आकर्षित करणारं कारलं चवीला कडू जरी असले, तरी ही त्यापासून मिळणारे अनेक फायदे नक्की गोड आहेत. आपणास ठाऊक आहे का कारल्याचे हे आरोग्यविषयक फायदे ? जर नाही तर मग नक्की जाणून घेऊया कारल्याचे फायदे...

कडू कारल्याचे १४ गुणकारी फायदे वाचा आणि लगेच अमलात आणा



- कारल्यामध्ये फास्फोरस मुबलक प्रमाणात आढळतं. हे कफ, बद्धकोष्ठता आणि पचनासंबंधी समस्या दूर करतं. कारल्याचा सेवनाने अन्नाचे पचन व्यवस्थित होते. तसेच भूक सुद्धा मोकळेपणाने लागते.
- दम्याचा त्रास असल्यास कारलं खूपच फायदेशीर ठरतं. या आजारात कारल्याची भाजी काही ही मसाले ना वापरता देखील भाजी बनवून खाल्याने फायदेशीर ठरतात.
- पोटात गॅस बनत असल्यास आणि अपचनामध्ये कारल्याच्या रस घेणे चांगलेच असते, जेणे करून आपल्यापासून हे आजार लांबच राहतं.
- कारल्याचा रस प्यायल्याने आपले यकृत बळकट होतच, त्याचबरोबर यकृताचे सर्व त्रास बरे होतात. दररोज नियमाने हे घेतल्यास एका आठवड्यात चांगले परिणाम दिसून येतात. कावीळ मध्ये देखील हे फायदेशीर आहे.
- कारल्याची पाने किंवा फळाला पाण्यात उकळवून प्यायल्याने, रोग प्रतिकारक शक्ती वाढते, आणि कुठल्याही प्रकाराचे संसर्ग झाल्यास बरे होतात.
- उलट्या, जुलाब, किंवा कॉलरा झाला असल्यास कारल्याचा रसात काळंमीठ टाकून प्यायलास लगेच आराम मिळतो. जलोदर झाला असल्यास देखील दोन चमचे कारल्याचा रस पाण्यामध्ये टाकून प्यायल्याने फायदा होतो.
- अर्धांगवायूचा त्रास झाला असेल तरी ही कारलं खाणे खूप प्रभावी उपाय आहे. त्यात कच्च कारलं रुग्णासाठी फायदेशीर आहे.
- रक्त स्वच्छ करण्यासाठी देखील कारलं अमृता सारखे आहेत. मधुमेहाचा आजारांसाठी देखील हे प्रभावी मानले आहे. मधुमेह असल्यास एक चतुर्थांश कप कारल्याचे रस, तेवढ्याच प्रमाणात गाजराचा रस पिणे शरीरासाठी फायदेशीर आहे.
- रक्ताळ मूळव्याध झाली असल्यास 1 चमचा कारल्याच्या रसात अर्धा चमचा साखर टाकून प्यायल्यास मूळव्याधीच्या त्रासात आराम मिळतो.
- संधिवात किंवा हातपायाची जळजळ होत असल्यास कारल्याच्या रस चोळणे फायदेशीर असतं.
- मूत्रपिंड (किडनी)च्या त्रासासाठी कारल्याचे उकळलेले पाणी आणि कारल्याचा रस दोन्हीही फायदेशीर असतात. ह्याचा सेवनाने मूत्रपिंड सक्रिय होऊन शरीरातील हानिकारक पदार्थांना शरीराच्या बाहेर काढते.
- हृदयाच्या विकारांसाठी कारलं हे रामबाणच आहे. हे हानिकारक चरबीला हृदयाचा रक्तवाहिन्यांमध्ये जमा होऊ देत नाही. यामुळे रक्त पुरवठा व्यवस्थित होतो आणि हृदयाघात होण्याची शक्यता नसते.
- लिंबाच्या रसाबरोबर कारल्याचे रसाला चेहऱ्यावर लावल्याने मुरूम बरे होतात, आणि त्वचेचे आजार होत नाही.
- कर्करोगाशी लढण्यासाठी कारल्याच्या रसाचे सेवन करणे फायदेशीर ठरते.

वयाच्या पन्नाशीतही दिसा यंग आणि फिट

वयाला हरवणाऱ्या काही सोप्या उपायांमुळे आपण ५० वर्षांनंतरही फिट, यंग आणि निरोगी राहू शकता. वय वाढत असल्यामुळे काही त्रास उद्भवणे साहजिक आहे. काही पर्याय निवडून आपण आपला त्रास कमी करू शकता. जसे शॉपिंगसाठी इकडे-तिकडे भटकण्यापेक्षा ऑनलाइन शॉपिंग करा. या वयात सुंदर दिसण्याची आवडही कमी होत जाते, म्हणून अनेक महिला अजागळासारख्या राहतात. परंतु, हा लेख केवळ त्या महिलांसाठी आहे ज्या पन्नाशीतही तिशीत असल्यासारख्या दिसू इच्छितात. हे काही सोपे उपाय अमलात आणून आपण या वयातही फिट आणि यंग दिसू शकता.



- **खाद्यपदार्थांनी पोषण मिळवा, सप्लिमेंट्सने नव्हे :** ऑर्गेनिक फूड सेवन करा आणि प्रोसेस्ड फूड जसे ब्रेड, पास्ता आणि चीज खाणे टाळा.
- **सूप :** भूक भागण्यासाठी सूप प्या. या वयात नियमित भाज्यांचे सूप तयार करून पिणे सर्वोत्तम आहे.
- **रात्री हलके जेवा :** रात्री जेवण्याची मात्रा कमी ठेवा. रात्री जेवल्याबरोबर झोपणे टाळा. रात्री कोणत्याही प्रकाराचे स्नॅक्स घेणे टाळा.
- **त्वचेला उपयुक्त आहार घ्या :** आपण जे काही खातो, त्याचा प्रभाव आपल्या शरीरावर होतो. म्हणून पोषक तत्त्वे आपल्याला निरोगी ठेवण्यात व सुंदरता वाढवण्यात मदत करतात.
- **प्रदूषणापासून दूर राहा :** स्वतः प्रदूषणमुक्त राहण्याचा प्रयत्न करा. घरातून बाहेर निघताना नाक मास्कने झाकून घ्या. सकाळी शुद्ध हवेत फिरा.
- **पायी फिरा :** दररोज अर्धा तास तरी पायी फिरा आणि सक्रिय राहा. एकाच जागी बसलात तर आपले पन्नाशीत फिट राहण्याचं स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही.



झोप येत नसेल, तर हे करून बघा

योग आणि योगासनात बरीच क्षमता आहे. योग करा म्हणजे आजार होणार नाही. आजार गंभीर नसला तरीही योग प्रभावी असू शकतो. आज आम्ही इथे सांगणार आहोत की, रात्री झोप येत नसल्यास केले जाणारे फक्त दोन उपाय; ज्यामुळे आपल्याला शांत झोप येईल.

झोप न येण्याची कारणं

तसे तर झोप न येण्याची अनेक कारणे असू शकतात पण दोन कारणं प्रामुख्यानं असू शकतात जसे की शरीराला थकवा न जाणवणं आणि काळजी किंवा सतत दिवसं रात्र विचार करणं. हीच दोन प्रमुख कारणे आहेत म्हणून त्यासाठी येथे दोन उपाय सांगत आहोत.

प्राणायाम

दररोज झोपण्यापूर्वी किमान ५ ते १० मिनिटे प्राणायाम करावा. आपण योगनिद्रेचा सरावदेखील करू शकता. यासाठी शवासनात झोपून शरीर, मन आणि मेंदूला सैल सोडा. डोक्यापासून पायापर्यंत आपल्या संपूर्ण शरीराला सैल सोडा. पूर्ण श्वास घेऊन सोडायचा आहे. आता असा विचार करा की, आपले हात, पाय, पोट, मान, डोळे सर्व काही सैल झाले आहेत. आता स्वतःला सांगा की, मी योगनिद्रेचा सराव करत आहे.

आता आपल्या मनाला शरीराच्या वेगवेगळ्या भागांकडे हलवा आणि त्यांना सैल आणि तणावरहित असण्याची सूचना द्या. आपल्या मनाला उजव्या पायाच्या अंगठ्यावर घेऊन जा. पायाची सर्व बोटे किमान तळपाय, टाच, पोटऱ्या, गुडघा, मांडी, नितंब, कंबर, खांदा सैलसर होत आहे. अशा प्रकारे डावा पाय देखील सैल सोडा. श्वास घ्या आणि सोडा.

आता झोपल्या झोपल्या ५ वेळा पूर्ण श्वास घ्या आणि सोडा. पोट आणि छाती वर-खाली होणार. पोट वर-खाली होणार. हा सराव दररोज करावा. यामुळे मन थकून झोपून जाणार आणि कोणत्याही प्रकारचा विचार करणार नाही.



सूचना

- दक्षिण दिशेला पाय करून झोपू नका.
- तामसी जेवण करू नका. रात्री हलकेच जेवण करावं.
- दिवसात किंवा दुपारी झोपण्याची सवय सोडून द्या.
- कोणत्याही प्रकारची नशा करू नका.
- झोपण्यापूर्वी आपली काळजी आणि विचारांना लांब ठेवून झोपा, कारण जेवढे महत्त्वाचे अन्न, पाणी आणि श्वास घेणे आहे, त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे झोप घेणे.
- रात्री उशिरापर्यंत जागणे आणि सकाळी उशिरा उठणे सोडा.
- झोपेची वेळ टाळल्याने झोप कमी होते.
- झोप बऱ्याच रोगांना स्वतःच ठीक करण्यास सक्षम असते.
- झोपेच्या अभावामुळे डोळ्याभोवती गडद वर्तुळे बनतात, तसेच डोळ्याभोवती काळपटपणा येतो.
- कमी झोपल्याने मेंदू थकलेला जाणवतो आणि वजनदेखील वाढते.

सूर्यनमस्कार

शरीराला थकवण्यासाठी झोपण्यापूर्वी १ तास व्यायाम करा किंवा फक्त १५ मिनिटांसाठी सूर्यनमस्कार करा. सूर्यनमस्कार १२ असतात. या सर्व १२ सूर्यनमस्काराची पुनरावृत्ती किमान १२ वेळा करा.

फोन चोरी झाल्यास अशा प्रकारे करा बँक डिटेल्स आणि मोबाईल वॉलेटचे रक्षण

तुमचा फोन चोरीला गेल्यास सर्वप्रथम तुमचं सिम कार्ड ब्लॉक करा. तसेच मोबाईल बँकिंग, यूपीआय पेमेंट आणि मोबाईल वॉलेट ब्लॉक करा. फोन चोरी झाल्याची तक्रार नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये करायला विसरू नका.



हल्ली

चोर तुमचा फोन मिळाल्यावर फक्त एकच गोष्ट शोधतात ते म्हणजे तुमचे बँक डिटेल्स. सध्या डिजिटल पेमेंट होत असल्यामुळे एकाच डिव्हाइसमध्ये वेगवेगळ्या ॲप्सचा समावेश असतो. स्मार्टफोन चोरण्यासाठी या डिजिटल वॉलेटपर्यंत पोहोचणं इतकं कठीण नाही. अशा अनेक वाईट घटना देखील घडल्या जिथे फोन चोरीला गेल्यावर बँक डिटेल्स मिळवून चोराने बँक अकाऊंट रिकामं केलं.

पोलिसांत तक्रार करा

या सर्व स्टेप्स फॉलो केल्यावर पोलीस अधिकाऱ्यांना तुमच्या चोरी झालेल्या डिव्हाइसची माहिती द्या. तुम्ही जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये फोन चोरी झाल्याची तक्रार करू शकता आणि एफआयआरची प्रत त्यांच्याकडून घेऊ शकता. जर तुमच्या फोनचा गैरवापर झाला किंवा तुमच्या फोनच्या माध्यमातून पैसे चोरीला गेले तर ही कॉपी पुरावा म्हणून वापरता येईल.

अशा प्रकारच्या धोक्यापासून वाचण्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत आणि फोन चोरीला गेल्यावर त्या केल्या पाहिजेत. जर तुमचा फोन हरवला किंवा चोरीला गेला तर तुम्ही पुढील पद्धती अवलंबून तुमच्या फोन किंवा त्यातील डेटाचा गैरवापर टाळू शकता.

सिम कार्ड ब्लॉक करा

फोन हरवल्यावर फोन नंबरचा गैरवापर टाळणं अत्यंत महत्त्वाचं आहे. सिम कार्ड ब्लॉक केल्यास फोनवरील प्रत्येक ते ॲप ब्लॉक करता येतात, जे ओटीपीच्या माध्यमातून ॲक्सेस केले जाऊ शकतात. तुम्ही नवीन सिम कार्डवर जुना नंबर मिळवू शकता. त्यासाठी काही वेळ लागू शकतो, परंतु तुमच्या प्रायव्हसीसाठी आणि मोबाईल वॉलेटच्या सुरक्षेसाठी सिम कार्ड ब्लॉक करणं अत्यंत आवश्यक आहे.

मोबाईल बँकिंग सर्व्हिस बंद करा

फोन चोर तुमचे बँक डिटेल्स सहज मिळवू शकतो, त्यामुळे बँक सर्व्हिस तत्काळ बंद करणं आवश्यक आहे. तुमचे सिम कार्ड आणि मोबाईल बँकिंग ॲप सिंक असतात, त्यामुळे रजिस्टर्ड नंबरवरील ओटीपीविना कोणीतही रक्कम ट्रान्सफर करणं कठीण आहे. परंतु फोन हरवल्यावर दोन्ही ब्लॉक करणे उत्तम.

यूपीआय पेमेंट डीॲक्टिव्हेट करा

जेव्हा तुम्ही ऑनलाइन बँकिंग सेवेपर्यंत पोहचू देत नाही तेव्हा चोर इतर मार्ग शोधू लागतो, ज्यात यूपीआयसारख्या पेमेंट ऑप्शनचा समावेश असतो. त्यामुळे थोडासाही वेळ न दवडता यूपीआय पेमेंट डीॲक्टिव्हेट करा. यासाठी तुम्हाला तुमच्या बँकेशी संपर्क साधावा लागेल.

सर्व मोबाईल वॉलेट्स ब्लॉक करा

मोबाईल वॉलेट्समुळे आयुष्य सोपं झालंय, परंतु जर तुमचा फोन चुकीच्या हाती पडला तर गुगल पे आणि पेटीएमसारखे मोबाईल वॉलेट महागात पडू शकतात. संबंधित ॲपच्या हेल्प डेस्कशी संपर्क करा आणि जोपर्यंत तुम्ही नवीन डिव्हाइसवर वॉलेट पुन्हा सेट करत नाही, तोपर्यंत ते ब्लॉक करण्यास सांगा.

या उद्भवतात समस्या– नखातील मळ, घाण पोटात गेल्याने पोटदुखी आणि अपचन यासारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. काही जणांना नखांबरोबर त्याच्या बाजूची त्वचा खाण्याचीही सवय असते. यामुळे नखांना नखुर्डे होण्याची शक्यता असते.

असा करा उपाय – काही मोठ्या व्यक्तीना देखील नखे खाण्याची इच्छा होते. याचे निरीक्षण करावे, समजा एखाद्या गोष्टीचा ताण आल्यावर किंवा एखाद्या गोष्टीची भीती वाटल्यावर नखे कुरतडली जातात. मात्र, अशावेळी शांतपणे विचार करा. स्वतःबाबत कोणत्याही प्रकारचा कमीपणा वाटून घेऊ नका. अतिविश्वास बाळगायला शिका. समस्यांना घाबरून न जाता सामोरे जायला शिका. कोणत्याही गोष्टींची उत्सुकता असेल त्यावेळी मन शांत ठेवत हात तोंडाकडे जाऊ देऊ नका.

तुम्हालाही नखे कुरतडण्याची सवय आहे?

आंघोळीच्या पाण्यात चिमुटभर मीठ मिसळण्याचे ४ आरोग्यदायी फायदे

बदलत्या वातावरणाचा परिणाम जसा थेट आरोग्यावर होतो तसाच तो त्वचेवरही होतो. ऋतूमानामध्ये बदल झाल्यानंतर त्वचाविकार जडण्याची शक्यता असते. त्वचाविकार हे काही काळापुरते वाढत असतात. अशावेळेस सुरूवातीच्या टप्प्यामध्ये अनेकदा लोकं आजाराकडे लक्ष देत नाही. जसाजसा त्रास वाढतो तसा त्रास अधिक गंभीर होऊ शकतो. म्हणूनच वेळीच या समस्येला रोखण्यासाठी पाण्यामध्ये चिमूटभर मीठ मिसळा.

मीठ पाण्याने आंघोळ करण्याचे फायदे –

- स्कीन इन्फेक्शनचा धोका टाळण्यासाठी आंघोळीच्या पाण्यात मीठ मिसळणं फायदेशीर आहे. या पाण्याच्या आंघोळीमुळे खाज येण्याच्या समस्येपासून सुटका मिळू शकते.
- त्वचेला तजेलदार ठेवण्याची क्षमता मीठाच्या पाण्यामध्ये आहे .कारण मीठ जंतूनाशक म्हणूनही काम करते.
- सांधेदुखीचा त्रास असर्णाया व्यक्तींना मीठाच्या पाण्याने आंघोळ करणं अधिक फायदेशीर आहे.
- कंबरेच्या दुखण्यावरही मीठाचे पाणी फायदेशीर आहे. मीठ आणि पाणी हे मिश्रण जसे जंतूनाशक असते तसेच दाहशामकदेखील आहे.

गुगल क्रोम मराठीत कसं वापरायचं? जाणून घ्या सोपी पद्धत

जर तुम्ही गुगल क्रोम इंग्रजी व्यतिरिक्त मराठी व अन्य भाषांमध्ये देखील वापरता येतं. जाणून घ्या भाषा बदलण्याची सोपी गुगल क्रोम जगभरातील सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या वेब ब्राउजर पैकी एक आहे. लोक वेब ब्राउजिंगसाठी गुगल क्रोमला पसंती देतात कारण ह्याचा युजर इंटरफेस सोपा आहे. गुगल क्रोममध्ये अनेक असे फीचर्स आहेत जे उपयुक्त ठरतात. त्यात अनेक भाषांचा सपोर्ट देखील दिला जतो. गुगल क्रोम सुरुवातीपासून इंग्रजी भाषेत येतो पण ह्यात इतर भाषांचा सपोर्ट देखील आहे. जर तुम्हाला इंग्रजी भाषेत ब्राऊजर वापरायचं नसेल तर तुम्ही क्रोम मराठीसह अन्य स्थानिक भाषेत वापरू शकता.

गुगल क्रोम वर आपल्या आवडीची भाषा बदलणं खूप सोपं आहे. जर तुम्ही देखील इंग्रजी व्यतिरिक्त क्रोम इतर भाषेत वापरू इच्छित असाल तर हे आर्टिकल तुम्हाला उपयुक्त ठरेल. आज आम्ही तुम्हाला लॅपटॉप, कंप्यूटर, अँड्रॉइड फोनमध्ये गुगल क्रोमची भाषा बदलण्याची सोपी पद्धत सांगणार आहोत.

पीसी वर क्रोम भाषा बदला



- गुगल क्रोमची भाषा बदलण्यासाठी तुम्हाला सर्वप्रथम आपल्या लॅपटॉप किंवा कंप्यूटरमध्ये गुगल क्रोम ओपन करावं लागेल.
- त्यानंतर लेफ्ट कॉर्नरवरील तीन डॉट मेन्यू ऑप्शनवर क्लिक करा आणि मग सेटिंग्स वर जा.
- इथे तुम्हाला लेफ्ट कॉर्नरवर Labguages चा ऑप्शन दिसेल.
- आता Add Languages वर क्लिक करा.
- Add Languages मध्ये तुम्हाला मराठीचा ऑप्शन दिसेल. तिथे क्लिक करून तुम्ही क्रोम मराठी व इतर भाषेत वापरू शकता.
- आता रिस्टार्टवर क्लिक करून गुगल क्रोम तुम्ही मराठी वापरू शकता.

एंड्राइड वर क्रोम भाषा बदला

- फोनवर गुगल क्रोमची भाषा बदलण्यासाठी सर्वप्रथम तुमच्या अँड्रॉइड फोनमध्ये गुगल क्रोम ओपन करा.
- त्यानंतर टॉप-लेफ्ट कॉर्नरवरील तीन डॉट मेन्यूवर क्लिक करा.
- सेटिंग्समध्ये जाऊन Lanfguages वर जा.
- त्यानंतर गुगल क्रोम वर जाऊन मराठी भाषा निवडा.
- भाषा डाउनलोड झाल्यानंतर रिस्टार्टवर टॅप करा आणि मराठीत क्रोम वापरण्यास सुरुवात करा.

नोट: पुन्हा इंग्रजी भाषेत क्रोम वापरायचं असल्यास तुम्ही वरील प्रोसेस पुन्हा फॉलो करू शकता.

पाणी पुरवठा करणाऱ्या सर्व धरणांमध्ये पातळी घट

जून अखेरपर्यंत पाऊस न पडल्यास मुंबईकरांवर आणखी १० टक्के पाणीकपात

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक



मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या सर्व धरणांमध्ये पातळी घटत चालत असतानाच पावसाचा काही अद्यापही पत्ता नाही. त्यामुळे मुंबईकरांवर मागील १५ मे पासून १० टक्के पाणीकपात करण्यात आल्यानंतर बुधवारपासून कमर्शियल वापराच्या पाण्यावरही २० टक्के कपात जारी करण्यात आली आहे. मात्र, तलावातील पाण्याचा साठा कमी होत असल्याने येत्या जून अखेरपर्यंत पावसाने हजेरी लावून तलावातील पातळीत वाढ न झाल्यास येत्या ५जुलै नंतर मुंबईकरांना आणखी पाणीकपातीला सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे निवासी वापराच्या पाणीकपातमध्ये आणखी दहा टक्के वाढ होणार असूनही ही कपात २० टक्क्यांपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

मुंबई पाणी पुरवठा करणाऱ्या सर्व धरणांमध्ये १४ लाख ४७ हजार एवढा दशलक्ष लिटर एवढ्या वर्षभराची पाण्याची गरज असून १७ जून २०२६ पर्यंत या धरणातील पाणी साठा १ लाख ४४ दशलक्ष लिटर एवढा पाणी साठा आहे. त्यामुळे पाणी साठा १०.०१ टक्के एवढाच आहे. तर मागील वर्षी या तारखेपर्यंत ९.७८ टक्के अर्थात १ लाख ४१ हजार ५१० दशलक्ष लिटर एवढा पाणी साठा होता तर त्या आधी म्हणजे सन २०२४मध्ये याच तारखेला ५.३८ टक्के म्हणजे ७७ हजार ८५१ दशलक्ष लिटर एवढा पाणी साठा होता. त्यामुळे तलावातील पाणी साठा घटत चाललेला असतानाही पावसाचा काहीही नेम नाही. अल निनोमुळे पाऊस लांबणीवर पडण्याची शक्यता असून भातसा आणि अप्पर वैतरणा धरणातील राखीव साठ्यातील पाणी उचलले जाणार आहे.

यामुळे भातसातून १ लाख ४७ हजार दशलक्ष लिटर आणि अप्पर वैतरणा धरणातून ९० हजार दशलक्ष लिटर पाण्याचा साठा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे एकूण २ लाख ३७ हजार दशलक्ष लिटर पाणी उपलब्ध होणार आहे. हा पाण्याचा साठा २७ ऑगस्टपर्यंत पुरेल एवढा आहे.

या दृष्टीकोनातून मागील १५ मे रोजी १० टक्के पाणीकपात लागू करण्यात आली आहे.तसेच बुधवारी १७ जूनपासून कमर्शियल वापराच्या पाण्यामध्ये २० टक्के कपात करण्यात आली आहे. त्यामुळे पाऊस लांबणीवर पडल्याने तलावातील पाणी साठा वाढेपर्यंत मुंबईकरांना योग्यप्रकारे पाणी मिळेल याचे नियोजन महापालिका प्रशासनाच्या जलअभियंता विभागामार्फत केले जात आहे.

मात्र, येत्या ३० जून पर्यंत पुरेसा पाऊस न पडल्यास मुंबईकरांवरील पाणीकपात आणखी काही टक्क्यांनी वाढवली जाण्याची शक्यता आहे. सध्याच्या दहा टक्के कपातीच्या तुलनेत अजून दहा टक्के कपात वाढवली जाण्याची शक्यता असून येत्या ५ जुलैपर्यंत तलाव क्षेत्रातील पाणी साठा आढावा घेवून पुढील कपात वाढवण्याचा निर्णय घेतला जाणार आहे. ही कपात १० टक्क्यांनी वाढवली जाणार असून येत्या ५ जुलैनंतर ही वाढ लागू होणे अपेक्षित आहेत. अर्थात ही कपात पाऊस लांबणीवर पडला तरच लागू केली जावू शकते,असेही बोलले जात आहे.

मराठी भाषा प्रमाणपत्र नसल्यास 15 ऑगस्टनंतर

अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांवर कारवाई

मंत्रालयात आयोजित विशेष बैठकीत राज्यातील विविध रिक्षा आणि टॅक्सी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत मराठी भाषा शिक्षण उपक्रमावर सविस्तर चर्चा करण्यात आली.



■मुंबई। प्रतिनिधी,

राज्यातील अमराठी रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे ज्ञान मिळावे आणि प्रवाशांशी संवाद अधिक सुलभ व्हावा यासाठी परिवहन विभागाने धोरणात्मक व ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. 1 जून ते 15 ऑगस्ट 2026 या कालावधीत सर्व अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी चार तासांचा 'मराठी भाषा संवाद पाठ्यक्रम' पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले असून, 15 ऑगस्टनंतर प्रमाणपत्र नसलेल्या चालकांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमासाठी शासनाने महाराष्ट्र राज्य मराठी भाषा विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ या संस्थांची अधिकृत तज्ञ संस्था म्हणून नियुक्ती केली आहे. या संस्थांमार्फतच चालकांना मोफत मराठी भाषा प्रशिक्षण दिले जाणार असून, त्यांच्याकडून देण्यात येणारे प्रमाणपत्रच परिवहन विभागाकडून ग्राह्य धरले जाणार आहे.

परिवहन विभागाचे सहआयुक्त रवी गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात (एमएमआर) प्रशिक्षण वर्ग मोठ्या प्रमाणावर सुरू असून यासाठी सुमारे 71 अभ्यास केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. या मोहिमेला शैक्षणिक बळ देण्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषदेचे सुमारे साडेचार हजार शिक्षक प्रशिक्षण कार्यात सहभागी झाले आहेत. तसेच सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांचे (आरटीओ) अधिकारी चालकांना आवश्यक सहकार्य करत आहेत.

प्रवाशांशी संवाद साधताना भाषेची अडचण दूर करणे, सेवा अधिक दर्जेदार बनविणे आणि चालकांच्या व्यावसायिक संधी वाढविणे हा या अभ्यासक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे विभागाने कळविले आहे. मराठी भाषेचे प्राथमिक ज्ञान मिळाल्याने प्रवासी व चालक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होणार असून दैनंदिन व्यवहार सुलभ होण्यास मदत मिळणार आहे.

धोकादायक इमारतीच्या पाडकामादरम्यान भिंत कोसळली...

सुदैवाने जीवितहानी नाही



■मुंबई। प्रतिनिधी,

भायखळा पश्चिम येथील दगडी चाळ परिसरात शुक्रवारी रात्री धोकादायक घोषित करण्यात आलेल्या इमारतीच्या पाडकामादरम्यान भिंतीचा काही भाग अचानक कोसळल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाली नसल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

महापालिकेच्या अग्निशमन दलाकडून रात्री ९.३६ वाजता सुंदर गल्ली, हंस रोड, दगडी चाळजवळील जी+२ मजली रिक्त इमारतीत दुर्घटना घडल्याची माहिती मिळाली. सुरुवातीच्या माहितीनुसार, इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचा काही भाग पहिल्या मजल्यावर कोसळला होता. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि संबंधित विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.

त्यानंतर वॉर्ड नियंत्रण कक्षाकडून मिळालेल्या अद्ययावत माहितीनुसार, संबंधित इमारत ही म्हाडाने 'सी-१' अर्थात अतिधोकादायक श्रेणीत वर्गीकृत केली होती. या इमारतीचे नियोजित पाडकाम सुरू असताना भिंतीचा काही भाग रस्त्याच्या दिशेने कोसळला. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ घबराट पसरली.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, इमारत रिक्त असल्याने कोणतीही व्यक्ती आत अडकली नव्हती. तसेच भिंत कोसळली त्या वेळी रस्त्यावरही मोठी वर्दळ नसल्याने संभाव्य मोठी दुर्घटना टळली. घटनास्थळी उपस्थित कर्मचाऱ्यांनी तत्काळ परिसर सुरक्षित करून नागरिकांना दूर ठेवण्याचे काम केले.

घटनेनंतर पाडकामाचे काम तातडीने थांबवण्यात आले असून ठेकेदाराला अतिरिक्त सुरक्षा उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. परिसरात संरक्षक बॅरिकेड्स उभारणे, पाडकामासाठी वापरण्यात येणाऱ्या यंत्रसामग्रीची तपासणी करणे आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे निर्देश प्रशासनाने दिले आहेत.

मुंबईत जुन्या आणि जीर्ण इमारतींची संख्या मोठी असून पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अशा इमारतींचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. दरवर्षी धोकादायक इमारतींच्या पाडकामाची मोहीम राबवली जात असली तरी अशा कामांदरम्यान सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करणे अत्यंत आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

दरम्यान, या घटनेत कोणतीही दुखापत किंवा जीवितहानी झाली नसल्याची अधिकृत पुष्टी करण्यात आली असून पुढील पाडकाम सुरू करण्यापूर्वी सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला जाणार आहे. त्यामुळे मोठी दुर्घटना टळल्याने स्थानिक नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

केबिनमध्ये तासाला 300 ते 800 रुपयांचा रेट, कचरापेटीत वापरेले कंडोम अन्... सांगलीमधील धक्कादायक प्रकार

■सांगली। प्रतिनिधी,

सांगली तून एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. शहरातील काही कॅफेची चौकशी करण्यात आली. कॅफेत प्रति तास 300 ते 800 रुपये देऊन भाड्याने खाजगी केबिन उपलब्ध करून दिले जात असल्याचा आरोप आहे. एका संस्थेनं दावा केला की, कॅफेत पोहोचल्यावर कचरापेटीत कंडोम आणि गोळ्या आढळल्या. विश्रामबाग पोलीस ठाण्यात एका तरुणीने लैंगिक अत्याचाराची तक्रार दाखल केल्यानंतर हा संपूर्ण प्रकरण उघडकीस आला.

प्रति तास 300 ते 800 रुपये आकारले जातात

या तक्रारीनंतर, स्थानिक संघटना, शिव प्रतिष्ठान युवा हिंदुस्थानने शहरातील काही कॅफेंबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. संस्थेचा दावा असा की, शहरातील कॅफे हे बऱ्याच काळापासून केवळ चहा आणि कॉफीपुरते मयार्दीत न राहता त्यातून इतर नको त्याच सेवा दिल्या गेल्या. तरुण जोडप्यांसाठी पडदे आणि विभाजन असलेल्या खाजगी केबिन उपलब्ध करून दिल्या होत्या, असा आरोप करण्यात आला. या केबिनसाठी प्रति तास 300 ते 800 रुपये आकारले जात होते, असेही वृत्त आहे.

कचरापेट्यामध्ये वापरलेले कंडोम



आणि...

या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मिळून कॅफेत तपासणी केली होती. त्यांच्या दाव्यानुसार, अनेक कचरापेट्यामध्ये वापरलेले कंडोम आणि गर्भनिरोध गोळ्या देखील आढळल्या होत्या. या दाव्यामुळे शहरातील कॅफे संस्कृती आणि तिच्या देखरेखीबाबत एक वादविवाद सुरू झाला होता. संघटनेच्या म्हणण्यांनुसार, काही कॅफेत कॅमेरे अशा कोनात लावण्यात आला होता, ज्याचा वापर ग्राहकांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि त्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी गेला जातो.

काही व्यक्तींनी मोबाईल फोनवर व्हिडिओ रेकॉर्ड करून ते व्हायरल करण्याची धमकी दिली. आरोपांना अद्यापही दुजोरा मिळालेला नाही. तपास यंत्रणा सध्या सर्व बाबींची चौकशी करत आहे. याच संघटनेनं याआधी देखील कॅफेच्या विषयावरून शहरात आवाज उठवला होता. संघटनेचं म्हणणं असं की, हा मुद्दा प्रशासनाकडे अनेकदा मांडला आहे. संघटनेनं मंत्री चंद्रकांत पाटील यांची देखील भेट घेतली होती.

दरम्यान, या कारवायांवर तात्पुरती का होईना बंदी घालण्यात आली होती, मात्र पुन्हा अशी प्रकरण होऊ लागलीत. लैंगिक अत्याचाराच्या घटना घडल्यानंतर, याच संघटनेनं एक मोहिम सुरू केली होती. कार्यकर्त्यांनी अनेक ठिकाणी भेटी दिल्या, नंतर पाहणी करत पोलिसांकडे तक्रारी दाखल केल्या. अशातच शहरातील कॅफे संस्कृतीबाबत पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित राहते.

विधवेसोबत राहण्याची स्वप्नं रंगवली बायकोला मंदिरात नेलं अन्...

आपल्या विवाहबाह्य संबंधात अडथळा ठरत असलेल्या निष्पाप पत्नीचा पतीने अत्यंत क्रूरपणे काटा काढल्याचे उघडकीस आले आहे. प्रेमसंबंधांसाठी रचलेला ह्या थरारक कटामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

कर्नाटकच्या बेळगाव जिल्ह्यातून एक धक्कादायक आणि मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. आपल्या विवाहबाह्य संबंधात अडथळा ठरत असलेल्या निष्पाप पत्नीचा पतीने अत्यंत क्रूरपणे काटा काढल्याचे उघडकीस आले आहे. संतोष पटायात असे या आरोपी पतीचे नाव असून, पोलिसांनी त्याला पत्नीच्या हत्येच्या आरोपाखाली अटक केली आहे. प्रेमसंबंधांसाठी रचलेला हा थरारक कट आणि त्यानंतर पोलिसांसमोर आलेले सत्य यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

विधवेशी प्रेमसंबंध

आरोपी संतोष पटायात याचा विवाह नऊ वर्षापूर्वी गोकाक तालुक्यातील सक्कुबाई हिच्याशी झाला होता. संसाराचे दिवस सुरळीत सुरू असतानाच, गेल्या चार वर्षापासून संतोषचे गावातील एका विधवा महिलेसोबत प्रेमसंबंध सुरू झाले. या विवाहबाह्य संबंधांमुळे पती-पत्नीमध्ये वाद होऊ लागले. प्रेयसीसोबत राहण्याच्या इच्छेपोटी संतोषने आपल्या निष्पाप पत्नीला कायमचे रस्त्यातून हटवण्याचा एक भयानक कट रचला.

अधिक मासाच्या निमित्ताने

आपल्या क्रूर कटाची अंमलबजावणी करण्यासाठी संतोषने सध्या 'अधिक मास' सुरू असल्याचे सांगून पत्नीला चामुंडेश्वरी देवीच्या दर्शनाला नेण्याचे ठरवले. भोळीभाबडी सक्कुबाई पतीच्या बोलण्यावर विश्वास ठेवून आनंदाने मंदिराकडे रवाना झाली. देवीचे दर्शन घेऊन परतत असताना, संतोषने तिला देवाचा 'प्रसाद' म्हणून प्यायला ज्यूस दिला. या ज्यूसमध्ये त्याने आधीच उंदीर मारण्याचे औषध (विष) मिसळले होते. ज्यूस पिताच सक्कुबाई बेशुद्ध झाली, त्यानंतर संतोषने तिला रस्त्याच्या कडेला नेऊन तिचा गळा आवळून खून केला. कोणालाही संशय येऊ नये म्हणून त्याने स्वतः पोलिसांना फोन करून पत्नीचा अपघात झाल्याचा बनाव रचला.

अपघाताचा बनाव

सक्कुबाईचा मृतदेह पाहिल्यानंतर पोलिसांना संतोषच्या अपघाताच्या कहाणीवर संशय आला. त्यांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी बेळगाव इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (इक्टर) येथे पाठवला. प्राथमिक शवविच्छेदन अहवालात सक्कुबाईचा मृत्यू अपघाताने नव्हे, तर गळा दाबल्यामुळे म्हणजेच हत्येमुळे झाल्याचे स्पष्ट झाले. या अहवालाच्या आधारे पोलिसांनी संतोषची कसून चौकशी केली असता, त्याने आपला गुन्हा कबूल केला. दरम्यान, या संपूर्ण कटामध्ये त्याच्या प्रेयसीचा काही सहभाग होता का, याचा तपास आता पोलीस करत आहेत.

पतीच्या अनैतिक संबंधामुळे पत्नीची गळफास घेऊन आत्महत्या

■मुंबई। प्रतिनिधी,



पतीच्या अनैतिक संबंधामुळे मानसिक नैराश्यातून पत्नीने आत्महत्या केल्याची घटना गोरेगाव परिसरात घडली. याप्रकरणी एक महिन्यांनी गुन्हा दाखल करुन आरोपी पती प्रदीप रघुनाथ गायकवाड याला दिडोंशी पोलिसांनी अटक केली. त्याच्यावर त्याची पत्नी मनिषा प्रदीप गायकवाड हिचा अनैतिक संबंधातून मानसिक व शारीरिक शोषण करुन तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याचा आरोप आहे. याच गुन्ह्यांत त्याला बोरिवलीतील स्थानिक न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे.

पती प्रदीप गायकवाड आणि दोन मुलांसोबत मनिषा गोरेगाव येथील दिडोंशीपाडा, कोयनानगर, साईबाबा चाळीत राहत होती. २०१७ मध्ये त्यांचा दोन्ही कुटुंबियांच्या संमतीने विवाह झाला होता. मात्र विवाहानंतर तो तिचा क्षुल्लक कारणावरुन मानसिक व शारीरिक शोषण करत होता. काही दिवसांपासून प्रदीपचे एका महिलेसोबत अनैतिक संबंध होते. या संबंधाची माहिती समजताच मनिषाने त्याला विरोध करण्यास सुरुवात केली होती. त्यावरुन तो तिला शिवीगाळ करुन मारहाण करत होता. त्याने तिला धमकावून हा प्रकार कोणालाही सांगितला तर जिवे मारण्याची धमकी दिली होती.

पतीच्या धमकीनंतरही तिने हा प्रकार तिच्या आजीला सांगितला होता. मात्र ती माहिती तिच्या घरच्यांना सांगू नकोस अशी विनंती केली होती. 17 मे 2026 रोजी त्याच्या लग्नाचा नववा वाढदिवस होता. त्या दिवशी त्याने मनिषाशी विनाकारण वाद घालून तिला शिवीगाळ करुन बेदम मारहाण केली होती.

या छळाला ती प्रचंड कंटाळून गेली होती. त्यातून तिला मानसिक नैराश्य आले होते. त्यामुळे तिने लग्नाच्या वाढदिवसाला रात्री साडेनऊ वाजता राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. तिच्या आत्महत्येनंतर प्रदीपमध्ये काहीच सुधारणा झाली नव्हती. तो मजेत राहत होता. याबाबत मनिषाच्या आई-वडिलांनी चौकशी केल्यानंतर त्यांना स्थानिक रहिवाशांसह तिच्या आजीकडून घडलेला प्रकार समजला.

प्रदीपला त्याच्या प्रेयसीसोबत राहायचे होते, त्यामुळे तो मनिषाचा मानसिक व शारीरिक शोषण करत होता. त्याला कंटाळून तिने आत्महत्या केली होती. हा प्रकार उघडकीस येताच तिच्या आईने दिडोंशी पोलिसांत प्रदीपविरुद्ध तक्रार केली होती. या तक्रारीनंतर मनिषाच्या आत्महत्येनंतर एक महिन्यानंतर पोलिसांनी प्रदीपविरुद्ध पत्नीचा मानसिक व शारीरिक छळ करुन तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. याच गुन्ह्यांत त्याला पोलिसांनी अटक केली. सध्या तो पोलीस कोठडीत असून त्याची पोलिसांकडून चौकशी सुरु आहे.

एमबीएमसी पोलीसचा यूपीतील एमडी ड्रग्ज कारखान्यावर छापा



■भाईंदर। प्रतिनिधी,

मिरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे प्रकटीकरण कक्ष - ४ च्या पोलिसांनी उत्तर प्रदेश राज्यात ड्रग्ज माफियांविरोधात कारवाई केली आहे. उत्तरप्रदेश राज्यातील हरदोईमधील संण्डीला पोलीस ठाणे हद्दीतून आरोपीकडून १ किलो २६ ग्रॅम वजनाचा एम.डी. हा अंमली पदार्थ तसेच एम.डी. ड्रग्ज तयार करण्यासाठी लागणारे एम.एम.ए.चे एकूण ३०० लिटर रसायन व एम.डी. ड्रग्ज बनविण्याचे लॅब साहित्य त्यात हिटींग ड्रायर, सेप्रेशन फ्लास्क, हिटींग मॅन्टल रिकव्हरी फ्लास्क, फोर फिंगर क्लॅम्प, एडीशन पॉट, बुकनर फनेल असा एकूण २ कोटी ७ लाखांचा रुपये किंमतीचा मुद्देमाल माल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी उत्तरप्रदेश आणि तेलंगणा राज्यात जाऊन एमडी ड्रग्ज तयार करणारे कारखाने उध्वस्त करत आतापर्यंत २० आरोपींना अटक करीत एकूण २२ कोटी ७९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्या मुद्देमालात ३०० लिटर ड्रग्ज बनविण्यासाठी लागणारे रसायन व २ किलो ३०० ग्रॅम एमडी जप्त करण्यात आली आहे. मिरा भाईंदर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखा - ४ च्या पोलिसांनी ४ एप्रिल रोजी मिरा रोडमध्ये राहणाऱ्या महिला फिरदोस कुरेशी यांच्या घरातून १ किलो ३२४ ग्रॅम वजनाचे २ कोटी ६६ लाख ७७ हजार २८० रुपये किमतीचा एमडी ड्रग्स हा अंमली पदार्थ जप्त करत गुन्हा दाखल केला होता.

त्यात पोलिसांनी त्या आरोपी महिला व तिचा पती अरबाज कुरेशी यांच्या विरोधात नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. त्यात पोलिसांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार तपास करत एकूण १८ आरोपींना अटक केली होती. त्यात मुंबईतील आगरीपाडा, मालवणी, मनोरी व तेलंगणा राज्यातील जहीराबाद परिसरातून एमडी ड्रग्ज तयार करण्यासाठी उभारलेली ड्रग्स फॅक्टरी व त्यासाठी लागणारे केमिकल व लॅबचे साहित्य असा २० कोटी ७२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. त्यानंतर सदरील गुन्हयातील आरोपी क्रमांक १९ तसलीम आरिफ छुटटन ऊर्फ रज्जाक याला १६ जून रोजी उत्तरप्रदेश राज्यातील हरदोई मधील संण्डीला पोलीस ठाणे हद्दीतून अटक करुन आरोपीकडून १ किलो २६ ग्रॅम वजनाचा एम.डी. हा अंमली पदार्थ तसेच एम.डी. ड्रग्ज तयार करण्यासाठी लागणारे एम.एम.ए.चे एकूण ३०० लिटर रसायन व एम.डी. ड्रग्ज बनविण्याचे लॅब साहित्य त्यात हिटींग ड्रायर, सेप्रेशन फ्लास्क, हिटींग मॅन्टल रिकव्हरी फ्लास्क, फोर फिंगर क्लॅम्प, एडीशन पॉट, बुकनर फनेल असा एकूण २ कोटी ७ लाखांचा रुपये किंमतीचा मुद्देमाल माल जप्त करण्यात आला आहे.

'ज्याने बलात्कार केला त्याच्याशीच मला लग्न करायचंय' अल्पवयीन मुलीची हादरवून टाकणारी कहाणी

■मुंबई। प्रतिनिधी,

इन्स्टाग्रामवरुन ओळख झालेल्या तरुणाने एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याची घटना घडली आहे. पीडितेने तक्रार दाखल करताना पोलिसांना सांगितले की, तिला त्याच तरुणासोबत लग्न करायचं आहे. यामुळे खळबळ माजली आहे. बिहारमधील मुझफ्फरपूर परिसरातील ही घटना आहे.



सोशल मीडियाच्या माध्यमातून झालेल्या ओळखीचा गैरफायदा घेत एका अल्पवयीन मुलीवर वारंवार बलात्कार केल्याची आणि तिला बळजबरीने गर्भपाताच्या गोळ्या दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. इन्स्टाग्रामवर मैत्री झालेल्या एका तरुणाने लग्न करण्याचे आमिष दाखवून या मुलीचे लैंगिक शोषण केले. मात्र, या संपूर्ण प्रकरणात पीडित मुलीने पोलिसांत तक्रार दाखल करताना, स्वतःवर अत्याचार करणाऱ्या आरोपीसोबतच आपले लग्न लावून द्यावे, अशी अजब मागणी केल्याने पोलीसही चक्रावून गेले आहेत. बिहारमधील मुझफ्फरपूर परिसरातील ही घटना आहे.

वाढदिवसावा बोलावलं अन्...

पीडित मुलीने दिलेल्या तक्रारीनुसार, घरच्या आर्थिक अडचणींमुळे ती स्थानिक एका मॉलमध्ये काम करत होती. याच दरम्यान तिची ओळख जवळच्याच दुसऱ्या एका मॉलमध्ये काम करणाऱ्या तरुणाशी इन्स्टाग्रामवर झाली. हळूहळू त्यांच्यात जवळीक वाढली. एका दिवशी आरोपीने पीडितेला त्याच्या वाढदिवसाच्या पार्टीसाठी आमंत्रित केले. तिथे त्याने तिच्या शीतपेयामध्ये अंमली पदार्थ मिसळले. पीडित मुलगी बेशुद्ध झाल्यानंतर आरोपीने तिच्यावर बलात्कार केला आणि त्याचे व्हिडिओ बनवून तिला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली.

लग्नाचे खोटे आश्वासन

यानंतर, 'मी तुज्याशी लग्न करेन' असे खोटे आश्वासन देऊन आरोपीने तिला वारंवार आपल्या घरी बोलावले आणि तिच्यावर सतत लैंगिक अत्याचार केले. या काळात पीडित मुलगी गरोदर राहिली असता, आरोपीने तिला जबरदस्तीने अनेक वेळा गर्भपाताच्या गोळ्या खायला घालण्यास भाग पाडले. जेव्हा पीडितेने त्याच्यावर लग्नासाठी दबाव आणण्यास सुरुवात केली, तेव्हा आरोपीने तिची फसवणूक करत लग्नास साफ नकार दिला. इतकेच नव्हे तर त्याने तिला पुन्हा धमकावण्यास आणि त्रास देण्यास सुरुवात केली, ज्यामुळे अखेर पीडितेने पोलिसांत धाव घेतली.

'मला त्याच्यासोबत लग्न करायचंय'

या संवेदनशील प्रकरणाची माहिती देताना वरिष्ठ पोलीस अधिकारी सुरेश कुमार यांनी सांगितले की, एका अल्पवयीन मुलीने लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक शोषण आणि छळ केल्याचा आरोप एका तरुणावर केला आहे. पीडितेने आपल्या तक्रारीत आरोपीसोबतच लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, प्राप्त अर्जाच्या आधारे गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू असून, या प्रकरणाचा सखोल आणि कसून तपास केला जात आहे. आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com